नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

श्रीकृष्ण ज्वेलर्स

आभूषणों की ९१.६ के सोने की एक विशेष श्रृंखला।
ग्राहकों के भरोसे के कारण कम समय में ही लोकप्रिय।
हार, चूड़ियाँ, मंगलसूत्र और महाराष्ट्रीयन आभुषण के विक्रेता।
हमारे यहा चांदी के सभी आभूषण मिलते है.
कॉफी हाऊस बिल्डिंग, गोकुलपेठ, नागपुर Ph. : 2557429, 2542486

* वर्ष ५१ * अंक १६१ * | * अमरावती * | रविवार, दिनांक १४ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### मुख्य सचिवांवर हक्कभंग आणणार



■ **नागपूर :** राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपत आले तरी सदस्यांनी मांडलेल्या अनेक लक्षवेधींना अद्याप उत्तर देण्यात आले नाही. भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला. त्यावर उद्या सभागृहाची बैठक संपेपर्यंत या लक्षवेधींची प्रलंबित उत्तरे दिली नाही, तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जाईल, असा इशारा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला.

### हेरगिरी प्रकरणी अटक

■ **आसाम :** आसाममधील सोनितपूर जिल्ह्यातून पोलिसांनी एका निवृत्त वायुसेना अधिकाऱ्याला अटक केली आहे. आरोपीची ओळख कुलेंद्र शर्मा अशी झाली आहे. कुलेंद्रवर पाकिस्तानी गुप्तहेर एजंटशी संबंध असल्याचा आरोप आहे. गुप्तचर माहितीच्या आधारे पोलिसांनी ही अटक केली.

आरोपी कुलेंद्र सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी एजन्सीशी संबंधित व्यक्तींच्या संपर्कात होता आणि त्यांना लष्कराशी संबंधित संवेदनशील माहिती देत होता. त्याच्या मोबाईल आणि लॅपटॉपमधून संशयास्पद सामग्री मिळाली आहे, मात्र काही डेटा डिलीट झाल्याची शक्यता आहे. सोनितपूरचे डीएसपी हरिचरण भूमिज यांनी सांगितले की, कुलेंद्रचे पाकिस्तानशी संबंध असल्याचा संशय खूप बळकट आहे. निवृत्त होण्यापूर्वी, कुलेंद्र तेजपूर वायुसेना स्टेशनमध्ये ज्युनियर वॉरंट ऑफिसर होता,

### हिमाचलमध्ये हिमवृष्टी

■ **मनाली :** हिमाचल प्रदेशमध्ये दीर्घ कालावधीनंतर वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय झाल्याने हवामानात बदल झाला आहे. शिमल्यासह बहुतेक भागांमध्ये सकाळपासूनच ढगाळ वातावरण आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रात्री चंबा, कांगडा, कुल्लू, लाहौल स्पीती येथील उंच शिखरांवर हलका हिमवर्षाव आणि सिरमौर जिल्ह्यात रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

उद्याही अधिक उंचीच्या भागांमध्ये हलक्या बर्फवृष्टीचा अंदाज आहे. १५ डिसेंबरपासून संपूर्ण राज्यात हवामान स्वच्छ होईल. मैदानी प्रदेशात गेल्या २५ दिवसांपासून धुके पडत आहे.

## पुणे-संभाजीनगर-नागपूर सुपर कनेक्टिव्हिटी

# रस्त्यांची कोटीच्या कोटी उड्डाणे

### महाराष्ट्रात रस्ते कामांना मोठी गती : नितीन गडकरींची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि.१३ :**

महाराष्ट्राच्या दळणवळण व्यवस्थेला आमूलाग्र बदल घडवून आणणारी महत्त्वाची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे.

पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा अत्याधुनिक महामार्ग उभारण्यात येणार असून, या प्रकल्पामुळे दोन्ही शहरांमधील प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

सध्या पुण्याहून संभाजीनगर गाठण्यासाठी किमान सहा ते साडेसहा तासांचा वेळ लागतो. मात्र, हा नवीन महामार्ग पूर्ण झाल्यानंतर हे अंतर केवळ दोन तासांत पार करता येणार असल्याची माहिती नितीन गडकरी यांनी दिली. सुमारे १६ हजार ३१८ कोटी रुपये खर्चाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, महाराष्ट्रातील औद्योगिक, व्यापारी आणि सामाजिक विकासाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना गडकरींनी या प्रकल्पाची रूपरेषा मांडली आणि हा महामार्ग केवळ पुणे-संभाजीनगरपुरता मर्यादित न राहता पुढे थेट नागपूरपर्यंत जाणारा एक्स्प्रेस हायवे ठरणार असल्याचे स्पष्ट केले.

या प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देताना गडकरी म्हणाले की, पुणे ते संभाजीनगर या मागासाठी नवीन एक्स्प्रेस हायवे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एमओयू आधीच झालेला असून, पहिल्या टप्प्यात पुणे, अहिल्यानगर आणि संभाजीनगर असा मार्ग विकसित केला जाणार आहे.



या मार्गावरील सध्याचा रस्ता पूर्णपणे दर्जेदार करण्यात येणार असून, वाहतुकीचा वेग आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. या मार्गावर काही ठिकाणी पूल उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा स्वतंत्र खर्च करण्यात येणार आहे.

या कामामुळे वाहतुकीतील अडथळे दूर होऊन प्रवास अधिक सुलभ होणार आहे. या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर पुणेझसंभाजीनगर मार्गावर वाहनचालकांना अधिक वेगवान आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळणार असल्याचे गडकरींनी सांगितले.

**ग्रीनफिल्ड मार्ग**

या प्रकल्पाचा दुसरा आणि महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्रापूरपासून सुरू होणारा ग्रीनफिल्ड हायवे. हा महामार्ग अहिल्यानगर जिल्ह्याच्या बाहेरून थेट बीड जिल्ह्यात प्रवेश करेल आणि पुढे संभाजीनगरशी जोडला जाईल. हा संपूर्णपणे नवीन आणि नियोजित ग्रीनफिल्ड मार्ग असणार असून, भविष्यातील वाहतूक वाढ लक्षात घेऊन त्याची रचना केली जाणार आहे.

प्रकल्पाशी संबंधित बहुतांश प्रक्रिया पूर्ण झाल्या असून, केवळ एका टोलसंदर्भातील निर्णय प्रलंबित आहे. हा टोल स्थानांतरित करण्यासाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागणार असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले. तो निर्णय अंतिम झाला की या ग्रीनफिल्ड हायवेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होईल.

या महामार्ग प्रकल्पामुळे राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्रे एकमेकांशी वेगाने जोडली जातील. याचा थेट फायदा उद्योग, व्यापार, पर्यटन आणि रोजगारनिर्मितीला होणार आहे, असा विश्वास केंद्रीयमंत्री गडकरी यांनी व्यक्त केला.

## कारखान्याच्या जमीन व्यवहाराला

# मुख्यमंत्र्यांचा ब्रेक!




### ७०० रुपयांच्या नोटरीवर सौदा कसा?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.१३ :**

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या बहुचर्चित जमीन खरेदी-विक्री व्यवहारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर हस्तक्षेप करत तातडीची स्थगिती दिली आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला कारखान्याची सुमारे ९९ एकर ९७ आर क्षेत्रफळाची जमीन २९९ कोटी रुपयांना खरेदी करण्यास राज्य सरकारने यापूर्वी मान्यता दिली होती. मात्र, या व्यवहारासाठी आवश्यक असलेली महसूल विभागाची पूर्वपरवानगी न घेतल्याचे समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.

नियमांची पूर्तता न करता एवढ्या मोठ्या आर्थिक व्यवहाराकडे वाटचाल होत असल्याचे लक्षात येताच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या व्यवहाराला तात्काळ ब्रेक लावण्याचे आदेश दिले. त्यांच्या निर्देशानुसार, महसूल विभागाकडून सखोल चौकशी होईपर्यंत आणि सविस्तर अहवाल सादर होईपर्यंत यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या जमीन व्यवहारावर स्थगिती राहणार आहे.

या जमीन व्यवहारामध्ये महसूल विभागाची परवानगी का आवश्यक आहे, याबाबत अनेक गंभीर बाबी पुढे आल्या आहेत. संबंधित जमीन प्रत्यक्षात यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या पूर्ण मालकीची नसून, तिचा ताबा आणि मालकी हक्क महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने या जमीन विक्रीस परवानगी दिली आहे का, याबाबतही कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. या प्रकरणात नियमांचे उल्लंघन झाले आहे का, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका काय आहे, याचीही चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## तत्कालीन एसडीओ बालपांडे निलंबित

### ६५ कोटींची वसुली : अवैध वाळू उपसा प्रकरणी विधानसभेत घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१३ :**
भंडारा जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी विधानसभेत ही घोषणा केली. या प्रकरणात सरकार ६५ कोटी रुपयांची वसुली करणार असून, संबंधित डेपोधारक कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

याच प्रकरणात, सेवानिवृत्त झालेले तत्कालीन तहसीलदार महेंद्र सोनवणे यांच्यावरही गुन्हेगारी खटला दाखल करण्याची कारवाई केली जाईल, असे महसूलमंत्र्यांनी सांगितले. सोनवणे यांचे 'सर्वात मोठे रॅकेट' असून, बालपांडे आणि सोनवणे यांनी बेकायदेशीर वाळू घाटांवर कधीही कारवाई केली नाही, उलट त्यांना संरक्षण दिले, ज्यामुळे शासनाचे मोठे नुकसान झाले, असा आरोप संबंधित आमदारांनी केला.
हे प्रकरण मौजा बेटाळा दक्षिण आणि मौजा बेटाळा उत्तर येथील दोन वाळू घाटांच्या डेपोंशी संबंधित आहे. हे घाट केशवप्रिया इन्फ्रास्ट्रक्चर, मालाड, मुंबई या कंपनीला तीन वर्षांसाठी देण्यात आले होते. पवनीच्या तहसीलदारांना २५ मे २०२५ रोजी गुळेगाव येथील वाडी डेपोमध्ये ३४,६०० ब्रास वाळूचा बेकायदेशीर उपसा झाल्याचा अहवाल तलाठींनी दिला होता. आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी यासंदर्भात सभागृहाचे लक्ष वेधले होते.

तत्कालीन तहसीलदार महेंद्र सोनवणे आणि उपविभागीय अधिकारी बालपांडे यांनी तलाठींच्या अहवालावर तातडीने कारवाई केली नाही. तसेच, त्यांनी स्थळ पंचनामा किंवा सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली नाही, असे समोर आले आहे. याशिवाय, जिल्हा खनीकर्म अधिकारी यांनीही अहवाल मिळाल्यानंतर ईटीएस सर्व्हे न केल्याने त्यांच्यावरही निष्क्रियतेचा आरोप आहे.

मंत्री बावनकुळे यांनी या प्रकरणातखनीकर्म अधिकारी यांची जास्त चूक असल्याचे मान्य केले. आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी उटड आणि जिल्हाधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली होती.

## 'मी देखील मुलीचा बाप'

### सत्ताधारी आमदाराचा विधानसभेत संताप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१३ :**
नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील एका ३ वर्षीय चिमुकलीवरील बलात्कार व हत्या प्रकरणी आज सत्ताधारी शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांनी आपल्याच सरकारला चांगलेच धारेवर धरले.

आम्हाला मालेगाव प्रकरणात उत्तर हवे आहे. मी स्वतः मुलीचा बाप आहे. येथील प्रत्येकजण मुलीचा बाप आहे. या राज्यात कायद्याची भीती राहिली की नाही? असा सवाल त्यांनी केला. मी सातवी नापास नाही, आपल्याला ग्रामीणच्या गृहमंत्र्यांचे उत्तर हवे आहे, असे आग्रह त्यांनी धरला.



## 'उडता महाराष्ट्र' का म्हणू नये?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
सातारा जिल्ह्यात चक्क एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज तयार करणारा कारखाना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. जावळी तालुक्यातील सावरी गावात चक्क एका म्हशीच्या गोठ्यात हा ड्रग्जचा कारखाना सुरू होता. मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने येथे धाड टाकत या रॅकेटचा पदार्फाश केला आहे.

या कारवाईत १० किलोहून अधिक एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले असून, तिघांना अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर विरोधकांनी सरकारवर प्रश्नांची सरबत्ती करत 'ही जागा उपमुख्यमंत्र्यांच्या नातेवाईकाची आहे का? आणि महाराष्ट्राला यामुळे 'उडता महाराष्ट्र' का म्हणू नये?' असे सवाल उपस्थित केले आहेत.

या कारवाईनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारला धारेवर धरले. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील सावरी गावात नक्की काय सुरू आहे? ही जागा उपमुख्यमंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीची आहे का नातेवाईकांची? तिथे



ड्रग्सची फॅक्टरी सुरु आहे का? बोगस नोटांचा कारखाना? मुंबई क्राइम ब्रांच आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी तिथे का पोहोचले आहेत? सरकार काय झाकण्याचा प्रयत्न करत आहे ? इथे नेमकं काय सुरु आहे ? सातारा जिल्हा पोलिस अधीक्षक इथे तातडीने का दाखल झालेत? प्रकाश शिंदे कोण आहेत? या सर्व प्रश्नांवर गृह मंत्रालयाने स्पष्टीकरण दिले पाहिजे, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

याच विषयावरून उबाठा शिवसेनेचे आमदार अंबादास दानवे यांनीही सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

## उच्च शिक्षणासाठी एकच मंडळ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :**
केंद्रीय मंत्रिमंडळाने 'विकसित भारत शिक्षण अधीक्षण विधेयक' मंजूर केले आहे. यानुसार, आता उच्च शिक्षणासाठी देशात एक मंडळ असेल आणि विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद यांसारख्या जुन्या नियामक संस्थांना एकत्र केले जाईल. तथापि, वैद्यकीय आणि विधी अभ्यासक्रम याच्या कक्षेतून वगळले जातील. हे विधेयक सध्याच्या संसद अधिवेशनातच चर्चेसाठी मांडले जाऊ शकते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये एका सामान्य आयोगाची स्थापना करण्याची चर्चा होती, जो देशातील विविध उच्च शिक्षण संस्थांना एका छत्राखाली आणेल. यानुसार, हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया स्थापन करण्याचा विचार केला जात होता.
आता याला 'विकसित भारत' या ब्रँडिंगसह विधेयक बनवण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, नवीन रचना उच्च शिक्षण सुलभ करण्यासाठी, नियामक ओव्हरलॅप कमी करण्यासाठी आणि खाजगी संस्थांमधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे. नवीन कायद्यानुसार, उच्च शिक्षणाची स्पष्ट कार्य-विभाजनासह पुनर्रचना केली जाईल. संस्थांचे नियमन, अधिमान्यता आणि शैक्षणिक मानके निश्चित करण्याचे काम एका मंडळाकडे असेल.

सुनिश्चिती त्यांच्या हास्याची
प्लस संरक्षणाची



एलआयसीची
प्रोटेक्शन
प्लस
सादर करीत आहोत
ठळक वैशिष्ट्ये:
- तुमच्या गरजांनुसार अनेक गुंतवणूक फंड पर्याय उपलब्ध
- टॉप-अप प्रीमियम भरून तुमचे जोखिम संरक्षण वाढवा
- वय आणि मुदतीनुसार अधिक विमा रक्कम निवडण्याचा पर्याय
- 5 वर्षांनंतर अंशत: पैसे काढण्याची मुभा

एक नॉन-पार, लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना
योजना सं.: 886 यूआयएन: 512L361V01
ऑनलाईन देखील उपलब्ध
आमचा व्हाट्सअॅप नं. 8976862090 बोला 'Hi'
अधिक माहितीसाठी तुमच्या एजंटशी/जवळच्या एलआयसीच्या शाखेशी संपर्क साधा/भेट द्या www.licindia.in
एलआयसी मोबाईल ॲप डाउनलोड करा LIC digital
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC/P1/2025-26/20/Mar

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्टस् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्टस् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वतःच जबाबदार असते. लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि प्रोटेक्शन प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.




■ **नागपूर :** सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यावर सभागृहात भाजपा आमदाराकडून आरोप झाले असतानाच मुंढे यांच्या समर्थनार्थ काँग्रेसने आज विधानभवनावर मोर्चा काढला. भाजपच्या आमदारांनी तुकाराम मुंढे यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे. त्याला विरोध दर्शवत काँग्रेसने हा मोर्चा काढला. काँग्रेसने यावेळी तुकाराम मुंढे यांच्या फोटोला दुग्धाभिषेकही केला. मुंढे यांच्यावर आरोप करणाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत निषेध नोंदविण्यात आला. आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने सहभागी झाले होते.



## विधीमंडळ अधिवेशन

## तलाठ्याने केले ४ ते ४० गुंठे
# मुद्या गाजला विधानसभेत



**नागपूर :** डहाणू तालुक्यातील मृतक जानकीबाई जैतू भंडारी यांच्या नावावरील अवघी चार गुंठे जमीन बेकायदेशीररीत्या चाळीस गुंठे करण्यात आल्याच्या गंभीर गैरव्यवहार प्रकरणात सहभागी असलेल्या दोन तलाठ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. या प्रकरणातील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारत संतोष कोटनाके आणि जासवीन जमजा या दोन तलाठ्यांना निलंबित केले आहे. या प्रकरणाकडे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. जानकीबाई भंडारी यांचे १९८६ साली निधन झाले असतानाही त्यांच्या जमिनीचा फेरफार बेकायदेशीररीत्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

मृत व्यक्तीशी रक्ताचे कोणतेही नाते नसताना राजेंद्र राऊत यांनी संबंधित जमिनीचा फेरफार स्वतःच्या नावावर करून घेतला असून, यामध्ये तलाठी व संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी संगनमताने मदत केल्याचा गंभीर आरोप आमदार जाधव यांनी केला. या गैरव्यवहारात केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांनाच नव्हे, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात येणार का, तसेच जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस बजावण्यात येणार का, असा थेट सवाल आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केला.

## शहरातील विकासकामे पूर्ण करताना उपयुक्ततेवर भर द्यावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
# अमरावती महानगरपालिकेच्या प्रश्नांबाबत आढावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

शहरातील विविध विकासकामे करताना त्याची भविष्यकालीन उपयुक्तता लक्षात घेऊन प्रकल्पांची निवड करावी. सद्यस्थितीत अपूर्ण असलेल्या प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समिती योजनेतून निधीची तरतूद करून पूर्णत्वास न्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधान भवन येथे अमरावती महापालिकेच्या विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अमरावती विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अमरावती शहरातील विविध विकासकामे कार्यान्वित करताना आवश्यकतेनुसार



निधी उपलब्ध करुन दिला जाईल. परंतु, निवड केलेले प्रकल्प हे भविष्यकालीन परिस्थिती लक्षात घेऊन निवडावे. शहरातील राजकमल रेल्वे ओव्हर ब्रीज उड्डाणपुलाच्या बांधकामाची मयार्दा संपुष्टात आलेली आहे. यामुळे वाहतूक कोंडी वाढलेली आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी महारेलकडून उड्डाणपुलाचे पूर्णतः मजबूत पुर्नबांधणी कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन घ्यावे. अमरावती येथे माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित करण्यासाठी स्थानिकांचा प्रतिसाद पाहून प्रकल्प रोजगारक्षम बनेल याद्दष्टीने प्रयत्न करावेत. शहरात नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजने अंतर्गत प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याच्या जलवाहिन्यांची कामे व पाणी टाकी बांधकाम आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत.

शहरातील जुन्या योजना, प्रकल्प अगोदर कार्यान्वित झाल्यानंतरच नवीन प्रकल्प प्रस्तावित करावेत. प्रकल्पांची उभारणी झाल्यानंतर त्याचे महत्व व उद्देश कायम राहावा याद्दष्टीने नियोजन करावे. प्रकल्पाच्या उभारणीनंतर तेथील देखभाल व दुरुस्ती कामे मिळण्याऱ्या महसूलातूनच करण्याचे नियोजन करावे. शहरातील छत्री तलाव पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे नागरिकांच्या सुविधेसाठी आणि पर्यटक आकर्षित करण्यासाठी येथील निमार्णाधीन कार्य तातडीने पूर्ण करावेत. यासाठी जिल्हा नियोजन समिती योजनेचा निधीची तरतूद करावी, असे निर्देश दिले.

शहर स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून वाढत्या लोकसंख्येनुसार भूमिगत गटारांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अमरावती हे विभागीय ठिकाण असूनही तेथील भूमिगत गटारे केवळ २० टक्के आहेत. स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींसाठी गटार योजना तातडीने पूर्णत्वास नेण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. तसेच नेहरू मैदान परिसरातील जुनी लाल शाळा व टाऊन हॉल बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार या सर्व प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

शहरातील श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी मंदीर परिसर वर्दळीचा आहे. या ठिकाणी भाविकांची गर्दी लक्षात घेता, प्रस्तावित विकासकाम पूर्ण करताना पहिले प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन रस्ते व नाले, सांडपाणी व्यवस्थापन, मंदीरालगतची दुकाने, भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, वाहन पार्किंग व्यवस्था आदीबाबी लक्षात घेऊन प्रस्ताव सादर करावा.

# राज्य शासनाच्या पीएचडी शिष्यवृत्तीसाठी वितरण मर्यादा व निकष ठरवणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**

राज्य शासनाच्या बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांमार्फत पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी लक्षांक ठरविण्यात येणार असून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.

बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत मिळण्याबाबत सदस्य डॉ. नितीन राऊत यांनी प्रश्न विचारला होता. त्यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी ही माहिती दिली. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, राज्य शासनाच्या विविध संस्थांमार्फत देण्यात



उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी गुणवत्तेचा विचार केला जाणार असून विद्यार्थ्यांच्या संशोधन विषयांचा प्रत्यक्ष उपयोग भविष्यातील कामकाजाला होतो का, याचीही तपासणी केली जाणार आहे.

जसे परदेशात उच्च शिक्षणासाठी मेरीटनुसार ठरावीक संख्येने विद्यार्थ्यांना पाठवले जाते, त्याच धर्तीवर डॉक्टरेटसाठीही गुणवत्ता हा मुख्य निकष राहील. तसेच शिष्यवृत्तीसाठी यंदाच्या विनियोजन विधेयकात तरतूद करण्यात आली असून लवकर ती देण्यात येईल.

वंचित घटकातील, अनाथ किंवा पालक नसलेल्या, मात्र मेरीटमध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत केली जाईल. अशा विद्यार्थ्यांना मदत करणे हे शासनाचे धोरण असून, ही मदत भविष्यातही सुरू राहील, असेही. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

## तुकाराम मुंढे यांना स्मार्ट सिटी प्रकरणात क्लिनचीट

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**



नागपूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंढे यांना स्मार्ट सिटी प्रकल्पातील कथित अनियमिततेप्रकरणी नागपूर पोलिस आणि आर्थिक गुन्हे शाखेकडून क्लिनचीट मिळाली आहे. भाजपा आमदार कृष्णा खोपडे यांच्यासह अन्य आमदारांनी गंभीर आरोप करूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. विधानसभेत या विषयावर लक्षवेधी मांडण्यात आली होती.

आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके आणि प्रताप अडसड यांनी मुंढे यांच्यावर आरोप केले होते की, त्यांनी नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नसतानाही नियमबाह्यपणे प्रकल्पाचा प्रभार स्वतःकडे घेतला. तसेच, २० कोटींहून अधिक रकमेचा भ्रष्टाचार केल्याचा दावाही आमदारांनी केला होता. त्यांनी मुंढे यांना निलंबित करण्याची मागणी केली होती. तत्कालीन सत्तापक्ष नेत्यांनी सर्व कागदपत्रांसह सदर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, मात्र मुंढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला नाही.

या लक्षवेधीवर झालेल्या चर्चेदरम्यान, प्रभारी नगर विकास मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, कोरोना काळात मुंढे यांनी स्मार्ट सिटीची कामे पाहिली होती आणि त्याला कार्योत्तर मंजुरी देण्यात आली होती. मुंढे यांनी स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून काही केल्याचे स्पष्ट झालेले नाही. २० कोटींच्या देयकासंदर्भात आर्थिक गुन्हे शाखा आणि पोलिसांनी दोनदा चौकशी केली असून, दोन्ही विभागांनी त्यांना क्लिनचीट दिली आहे.

दरम्यान, महिला अधिकाऱ्यांशी अपमानास्पद वागणूक दिल्याप्रकरणी महिला अधिकारी राधिका रस्तोगी यांच्याकडून चौकशी सुरू आहे. या चौकशीचा अहवाल येत्या महिनाभरात सादर केला जाईल, त्यानंतर निर्णय घेण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

# कृषी विद्यापीठांत शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त



**नागपूर :** राज्यातील चार प्रमुख कृषी विद्यापीठांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ७,१०० हून अधिक पदे रिक्त आहेत. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी विधान परिषदेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. विधान परिषदेच्या अनेक सदस्यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि इतर तीन प्रमुख विद्यापीठांमधील रिक्त पदांची संख्या विचारली होती. तसेच मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे शिक्षण आणि संशोधनावर परिणाम होत आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना भरणे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात २,२३५ पदे रिक्त आहेत. इतर तीन विद्यापीठांमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा समावेश आहे.राज्यातील या चारही प्रमुख कृषी विद्यापीठांमध्ये मिळून शिक्षक आणि शिक्षकेतर संवगार्तील एकूण ७,१९९ पदे रिक्त असल्याची माहिती भरणे यांनी दिली. तरीही, इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचारी कामाचा भार व्यवस्थित सांभाळत आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. चारही कृषी विद्यापीठांमधील सर्व रिक्त पदांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू असल्याचे मंत्र्यांनी सांगितले.

## आरटीओमध्ये बदलीसाठी प्रत्येकी ५० लाखांची मागणी
# कारवाई का नाही? अनिल परबांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. १३ :**



शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी परिवहन विभागाचे अतिरिक्त आयुक्त भरत कळसकर यांच्यावर गंभीर आरोप करत सभागृहात खळबळ उडवून दिली. "माझ्याकडे 'ब्रह्मास्त्र' आहे, मला कोणीही रोखू शकत नाही," अशी दर्पोक्ती करणाऱ्या या अधिकाऱ्याने बदल्यांसाठी तब्बल 331 अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी 50 लाख रुपयांची मागणी केल्याचा धक्कादायक गौप्यस्फोट अनिल परब यांनी विधान परिषद सभागृहात केला.

अनिल परब यांनी कळसकर यांच्या भ्रष्टाचाराची कुंडलीच सभागृहात मांडली. ते म्हणाले, "भरत कळसकर यांनी 331 अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यासाठी प्रत्येकी 50 लाख रुपयांची मागणी केली. 'पहिले 10 लाख द्या, मग पोस्टिंग करतो', अशी त्यांची पद्धत आहे. या जाचाला कंटाळून विभागातील 245 अधिकाऱ्यांनी चक्क मुख्यमंत्री कार्यालयाकडे तक्रारी केल्या आहेत. कदाचित मंत्र्यांना याची कल्पना नसेल, पण इतक्या मोठ्या संख्येने तक्रारी जाऊनही कारवाई का होत नाही?" असा सवाल अनिल परब यांनी उपस्थित केला.

भरत कळसकर यांच्या अरेरावीचा किस्सा सांगताना परब म्हणाले की, हा अधिकारी स्वतःला कुणीच रोखू शकत नाही, अशा थाटात वावरतो. "माझ्याकडे आमदार आणि खासदारांची पत्रे येतात, ती मी कचऱ्याच्या टोपलीत टाकतो. माझे आता केवळ ७ महिने राहिले आहेत. मी कामात 'अतिरेकी' आहे, मला कोणी रोखू शकत नाही," असे हा अधिकारी उघडपणे बोलतो. त्याने आतापर्यंत ६०० बदल्या केल्याचा आणि बोगस लायसन्स वाटल्याचा दावाही अनिल परब यांनी केला. भरत कळसकर आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना धमकावताना 'माझ्याकडे ब्रह्मास्त्र आहे' असे सांगतात, यावर परब यांनी बोट ठेवले. "मी तक्रारींना भीत नाही, मला जे करायचे आहे तेच मी करणार. माझ्याकडे ब्रह्मास्त्र आहे," असे हा अधिकारी म्हणतो. मग हे ब्रह्मास्त्र नेमके कोण आहे? कोणाच्या जीवावर हा अधिकारी एवढा माजला आहे?

## सरकारी रुग्णालयातून बोगस औषधींचे वितरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**

राज्यातील सरकारी आरोग्य संस्थांमध्ये बोगस औषधांचा पुरवठा आणि वापर होत असल्याची धक्कादायक माहिती विधान परिषदेत उघड झाली आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आमदारांच्या तारांकित प्रश्नांना उत्तर देताना, राज्यातील ११ शासकीय रुग्णालयांनी स्थानिक स्तरावर खरेदी केलेली औषधे बनावट आढळल्याची कबुली दिली.

बनावट कफ सिरपमुळे झालेल्या बालकांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर या माहितीमुळे आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. आमदार निरंजन डावखरे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, उमा खापरे यांच्यासह ३० हून अधिक सदस्यांनी बनावट औषधांच्या वापरावर आणि विक्रीवर बंदी घालण्याबाबत शासनाला जाब विचारला होता.

# मुबलक घरे उपलब्ध होण्यासाठी हाउसिंग स्टॉक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**



जुन्या लोकांना तातडीने घरे देणे तसेच नवीन प्रकल्पांकरिता मुबलक घरे उपलब्ध होण्यासाठी हौसिंग स्टॉक निर्माण करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी विधान परिषदेत केली. महाराष्ट्रात तसेच मुंबईमध्ये वन, कांदळवन,सीआरझेड, इत्यादी ठिकाणी मूळ स्थितीत पुनर्विकास होऊ शकत नाही.तसेच बऱ्याचशा पायाभूत प्रकल्प जसे की रस्ता रुंदीकरण,मेट्रो,पाणी व मलनिस्सारण प्रकल्प इत्यादींना जलदगतीने पुढे नेण्यासाठी पीएपीची गरज भासते, अशी माहितीही त्यांनी दिली.

त्याचप्रमाणे समाजातील गरीब गरजू घटकांना जसे गिरणी कामगार, डब्बेवाले, माथाडी इत्यादींना घरे देण्याचे शासनाने धोरण स्विकारलेले आहे.या सर्वांना वेळेवर घरे देता याकरीता मोठ्या प्रमाणात राज्यस्तरावर हौसिंग स्टॉकची आवश्यकता लागणार आहे, आणि म्हणूनच याबाबतीत निर्णय घेण्यात आल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या सर्व घटकांना घरे देण्यासाठी शासनाच्या विविध योजनेतून उपलब्ध होणारे हौसिंग स्टॉकला एकत्रित करून त्याचा सुनियोजित प्राधान्यक्रमाने वितरण करण्याचे शासनाने धोरण ठरविले आहे.या हौसिंग स्टॉक करीता मुंबईतील ३३ (७), ३३ (९), ३३ (१२ बी) यासह विविध योजना तसेच राज्यस्तरावरील इन्क्ल्युसिव्ह हौसिंग, पीएमएवाय इत्यादी योजनांचा समावेश करण्याचा आमचा मानस असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

खारफुटीच्या जमिनींवर अतिक्रमणे करण्याचे प्रकार घडले आहेत.

## विद्यार्थी वसतीगृहातील भोजनच्या दर्जात तडजोड नाही : संजय शिरसाट



**नागपूर :** राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्यासाठी सातत्याने सुधारणा केल्या जात आहेत. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जा व इतर सोयीसुविधांबाबत कोणतीही तडजोड राज्य शासन करणार नाही, असे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले. सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहातील भोजन व इतर सोयीसुविधांबाबत सदस्य बाबासाहेब देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मंत्री शिरसाट यांनी ही माहिती दिली. सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले की, राज्यात एकूण ४४९ वसतीगृह असून त्यापैकी २३१ मुलांची तर २१८ मुलींची वसतीगृह आहेत. या वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्यासाठी सातत्याने सुधारणा केल्या जात आहेत. या त्रुटींप्रकरणी संबंधित भोजनपुरवठा करणाऱ्या ठेकेदारांवर आतापर्यंत सुमारे ५५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार व पौष्टिक आहार मिळलाच पाहिजे, अशी राज्य शासनाची भूमिका असून ठेकेदार कोण आहे, याला कोणतीही सूट दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करून भोजनपुरवठ्याचा करार तीन वर्षांसाठी देण्यात आला असला तरी गुणवत्तेत कसूर झाल्यास कारवाई अटळ असल्याचे मंत्री शिरसाट यांनी सांगितले.

## राजुरातील ७० वर्षाच्या वृक्षाच्या बेकायदा छाटणीप्रकरणी चौकशी करणार



**नागपूर:** चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथील नगरपालिकेच्या शेजारील रस्त्यालगतच्या ७० वर्षे जुने वृक्ष तोडल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. सदस्य देवराम भोंगळे यांनी यासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होते. मिसाळ यांनी सांगितले की, केवळ तोंडी सूचनेवर, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तब्बल ७० वर्षे जुन्या वृक्षाची छाटणी करण्यात आल्याचे समोर आले आहे.

## बीडमध्ये संतापजनक घटना
# 'लक्ष्मी देवी' मूर्तीची विटंबना

■ **महासागर प्रतिनिधी**
**बीड, दि. १३ :**

बीड शहराला हादरवून सोडणारी एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. शहरातील प्रसिद्ध कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस, सर्वे नंबर ९० मध्ये असलेले जागृत देवस्थान श्री लक्ष्मी आई मंदिरात पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास समाजकंटकांनी मंदिराची व मूर्तीची तोडफोड करण्याचा घृणास्पद प्रयत्न केला. या पवित्र स्थळाला गेल्या काही काळात वारंवार लक्ष्य केले जात आहे. यापूर्वी अशा प्रकारची विटंबना दोन ते तीन वेळा घडली असून, वारंवार तक्रारी दाखल करूनही हा प्रकार थांबत नसल्याने आता समस्त हिंदू धर्मीयांमध्ये तीव्र संतापाचे आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### नेमके काय घडले?

लक्ष्मी आई देवस्थानात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जत्रा भरते आणि दररोज सकाळी भक्त दर्शनासाठी येतात. आज सकाळी नितीन रमेश कांबळे हे दर्शनासाठी जात असताना त्यांना हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अज्ञात समाजकंटकांनी दगडांचा वापर करून देवीच्या मूर्तीची जाणीवपूर्वक तोडफोड करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. या हल्ल्यात देवीच्या मूर्तीचे तसेच मंदिराचेही मोठे नुकसान



झाले आहे.

या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे समाजाच्या भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत. बीड शहरातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ वारंवार लक्ष्य होत असतानाही, यावर कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याबद्दल प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ मंदिराच्या ठिकाणी पंचनामा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या दरम्यान, समाजाने आणि विविध संघटनांनी या घटनेचा जाहीर निषेध केला. सकल हिंदू सेनेसह विविध हिंदू संघटनांच्या वतीने जाहीर निषेध करत, आरोपीला तात्काळ पकडून कठोर कारवाई करून शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. समाजाच्या भावना दुखावल्याची घटना असल्याने सर्व समाज एकत्र आला.

## तहसीलदारांसह ४ मंडल अधिकारी, २ तलाठी निलंबित

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात वनीकरणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रात झालेल्या ९० हजार ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खननाप्रकरणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कठोर भूमिका घेतली. या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या चार तहसीलदार, चार मंडल अधिकारी आणि दोन तलाठी अशा नऊ जणांचे निलंबन करण्यात आले. परवानगीपेक्षा ९० हजार ब्रास अधिक उत्खनन झाल्याचे ईटीएस मोजणीत निष्पन्न झाले असून, यावर फौजदारी व महसूली अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

आमदार सुनील शेळके यांनी मावळ येथील उत्खनन गैरव्यवहाराबाबत आज विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. उत्खनन प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असून, अधिकारी आठ महिने टाळाटाळ करत अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप शेळके यांनी केला होता.

महसूल मंत्र्यांनी सांगितले की, विभागीय आयुक्तांनी दोनदा चौकशी केली. गट क्रमांक ३६, ३७, आणि ३८ मध्ये खाणपट्टे मंजूर होते, मात्र ३५, ४१, ४२, आणि ४६ या गट क्रमांकांवरही गौण खनिजाचे तात्पुरत्या स्वरूपाचे उत्खनन झाले आहे.

## चंद्रपूरला औष्णिक ऊर्जा प्रकल्प मिळणार
# ८०० मेगावॅटचा जंबो प्रकल्प

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**

महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी शनिवारी राज्याच्या महत्त्वाकांक्षी ऊर्जा उद्दिष्टांची माहिती दिली. राज्याची वाढती विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी चंद्रपूर येथे ८०० मेगावॉटचा नवीन औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या योजनांना बळ देणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार किशोर जोरगेवार यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना त्यांनी अक्षय ऊर्जा क्षमतेबाबत विधानसभेत माहिती दिली.

राज्य सरकार चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन येथे प्रगत अल्ट्रा सुपरक्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित ८०० मेगावॉट क्षमतेचा नवीन युनिट उभारण्याचा विचार करत आहे. या प्रकल्पासाठी सविस्तर अहवाल आणि तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता मूल्यांकन सादर करण्यात आले आहे. हा प्रकल्प २०२८-२९ पर्यंत व्यवहार्य ठरेल. जुन्या युनिट्सच्या तुलनेत अधिक कार्यक्षमता आणि कमी उत्सर्जनामुळे हे तंत्रज्ञान देशभरात पसंत केले जात असल्याचे मंत्री बोर्डीकर यांनी नमूद केले.

मंत्री बोर्डीकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र २०५० पर्यंत जीवाश्म इंधनातून होणारे निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. नॅशनल बिल्डिंग कोड २०१६ नुसार, २०३० पर्यंत जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी १५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारतींमध्ये विशिष्ट मानकांचे पालन करणे आवश्यक आहे. एकूण वीज निर्मितीपैकी ४० टक्के वीज अक्षय ऊर्जा स्त्रोतांद्वारे



निर्माण करण्यास सरकार कटिबद्ध आहे.

२०२० मध्ये जाहीर केलेल्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत धोरणानुसार, राज्याने नवीकरणीय स्त्रोतांपासून १७,३६० मेगावॉट वीज निर्मिती क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अखंड आणि शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी एक व्यापक मोहीम सुरू आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

महावितरणने विविध वीज खरेदी करारांद्वारे एकूण ४२,५१८ मेगावॉट वीज मिळवली आहे. यात अल्प-मुदतीच्या करारांमधून २,२०३ मेगावॅट आणि मध्यम-मुदतीच्या करारांमधून ९८४ मेगावॅट विजेचा समावेश आहे. महावितरणने २०२१-३२ पर्यंत ८०,२०० मेगावॅट विजेसाठी वीज खरेदी करार केले आहेत. सौर आणि पवन ऊर्जेतील अनियमितता आणि ग्रिडची स्थिरता राखण्यासाठी राज्य नवीन औष्णिक प्रकल्पांवरही काम करत असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले.

# अरविंद चावरिया यांना अमरावती पोलीस आयुक्त पदावरुन हटविले

### राकेश ओला यांची तडकाफडकी अमरावती पोलीस आयुक्त पदी नियुक्ती ■ राज्यपालांच्या आदेशावरुन कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.13)-** बरोबर सहा महिन्यांपुर्वी तत्कालीन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या जागी अमरावतीचे नवे पोलीस आयुक्त म्हणून पदभार स्विकारणारे अरविंद चावरिया यांना शनिवारी(दि.13) त्यांच्या पदावरुन हटविण्यात आले, तर त्यांच्या जागी मुंबईला पोलीस उपायुक्त कार्यभार सांभाळत असलेले राकेश ओला यांची नियुक्ती करण्यात आली. नागपूरातील हिवाळी अधिवेशनाला अवघा एक दिवस उरलेला असताना शासनाचे सह सचिव व्यंकटेश माधव भट यांनी राज्यपालांच्या आदेशावरुन हा बदलीचा शासन आदेश काढला.



अरविंद चावरिया



राकेश ओला

परंतू असे काय घडले की, अरविंद चावरिया यांना तडका फडकी पदावरुन हटविण्यात आले. हा प्रश्न संपूर्ण अमरावतीवासियांना सलत आहे.

प्राथमिकरित्या अमरावती शहरात वाढत असलेल्या गुन्हेगारीला अरविंद चावरियांच्या बदलीला कारणीभूत ठरविले जात आहे. अमरावती शहरात एवढीच गुन्हेगारी तत्कालीन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या काळात होती, आणखीन थोडे मागे गेलो तर याहून अधिक गुन्हेगारी आरती सिंह यांच्या काळात होती. इतकेच नव्हे तर जे नव्हे ते अवैध धंदे शहरात सुमार होते. नविनचंद्र रेड्डी यांच्या काळात मे महिन्यापर्यंत महिन्याला तीन हत्या होत होत्या, चावरिया यांच्याही काळ तीच परिस्थिती आहे. प्राणघातक हल्लेही तेवढेच आहे. उलट चावरिया यांच्या काळात 9 दरोडे नोंदविल्या गेले. तर रेड्डी यांच्या काळात 14 दरोडे नोंद झाले. वाहन चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे चावरिया यांच्या काळात उघडकीस आले, असे असताना चावरियांना का हटविले? हा प्रश्न अजुनही अनुत्तरित आहे. कुणाचे आर्थिक मने दुखली, कोणत्या नेत्याने हिवाळी अधिवेशनात चावरियाविरुध्द आदळआपट केली? असे अनेक प्रश्नांचे उत्तरे अजून शहरातील नागरिकांना मिळाले नाही. थेट राज्यपालांनी या बदलीमध्ये रस दाखवावा असे काय घडले.

#### मनपा निवडणूक सोयीची व्हावी म्हणून प्रयत्न ?

काही लोक आपआपल्या सोयीने चावरियांच्या बदलीचे गणित मांडत आहेत. मात्र चावरिया यांच्या बदलीचा स्वतंत्र आदेश काढून त्यांना तडकाफडकी हटविल्यामागिल कारण आगामी महापालिका निवडणूक तर नाही ना? निवडणूकीमध्ये काही पुढाऱ्यांना येथील पोलीस आपल्या मनाचे हवे आहे का? असे एक ना अनेक प्रश्नांचे चर्चाचर्वण शहरात होत आहे. बरं चावरियांची बदली कोठे करण्यात आली, हेसुध्दा बदली आदेशात नमूद नसल्याने ही चावरियांची कारवाईरुपी बदली असावी असेही बोलले जात आहे.

## ‘रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता?’

### चांदूर रेल्वे-नांदगाव खंडेश्वर रस्त्याची दुर्दशा

#### धुळी मुळे दुचाकी चालक त्रस्त





महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 13) -** चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर या महत्त्वाच्या मार्गाची दुरवस्था दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता? असा संभ्रम निर्माण करणाऱ्या या मार्गाने आता नागरिकांचा संयम संपुष्टात आणला आहे.

या रस्त्यावरून दिवसेंदिवस हजारो दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहने धावतात. परंतु रस्त्यामध्ये ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, तर काही ठिकाणी पाईप बसवण्यासाठी खणलेल्या जागी उंचवटे तयार झाल्याने वाहनचालकांची अक्षरश: सर्कस सुरू आहे.

धुळीमुळे दुचाकीस्वारांचे डोळे मोठे त्रासले जात आहेत. वाहनांचे ब्रेक, सस्पेन्शन, टायरही जास्त प्रमाणात खराब होत असल्याने नागरिकांच्या खिशावरही मोठा आर्थिक बोजा पडत आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे पाईप टाकण्यासाठी रस्ता उकरला, पण नंतर मुरुम टाकून काम उडवले. जेथे पाईप पाडले तेथेच डोंगराएवढे उंचवटे तयार झाले. मोठी वाहने गेल्यानंतर उडणारी धूळ तर इतकी की समोरचे वाहन दिसेनासे. या उंचवट्यांवरून जाणे म्हणजे गाडीची कसरत आणि चालकाची परीक्षा! कुऱ्हा ङ्क चांदूर रेल्वे ङ्क नांदगाव खंडेश्वर हा रस्ता नव्याने बनणार असल्याची माहिती मिळाली असली तरी त्याची निश्चित वेळमर्यादा मात्र शून्य. नवीन रस्ता होईल तेव्हा होईल, पण तोपर्यंत आम्ही खड्ड्यांतूनच प्रवास करायचा का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

नवीन रस्त्याचा प्रकल्प हा दीर्घकालीन असला तरी, किमान तात्पुरती डांबरीकरण-डागडूजी करावी, जेणेकरून नागरिकांना हा त्रास सहन करावा लागू नये, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ, लहान व्यापारी आणि नियमित प्रवासी यांनी केली आहे.

#### रस्त्याची दुरुस्ती करावी

मी चांदूर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर या रस्त्याने कामानिमित्य दररोज येणे - जाणे करतो. या रस्त्याची स्थिती अत्यंत खराब असून जागोजागी खड्डे पडले आहे. यामुळे अनेक अपघात सुद्धा होत आहे. तसेच अनेकांना मणक्याचे, पाठीचे आजार खड्ड्यांमुळे होत आहे. तरी प्रशासनाने नवीन रस्ता होईपर्यंत सध्या तात्पुरती दुरुस्ती तरी करावी.

**निलेश देऊळकर, नागरिक, चांदूर रेल्वे**

## राष्ट्रीय महामार्गावर पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण

### शुक्रवारी रात्रीची घटना; लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 13) -** लोणी पोलीस ठाणे हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर एका ढाब्याजवळ वाहनाच्या किरकोळ धडकेनंतर झालेल्या वादातून पोलिस कर्मचाऱ्यावर मारहाण करण्यात आल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी गोपाल धारस्कर यांच्या तक्रारीवरून लोणी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल धारस्कर हे मूर्तिजापूरहून कारने प्रवास करत होते. राष्ट्रीय महामार्गावरील एका ढाब्याजवळ असलेल्या ब्रेकरवर समोर असलेल्या वाहनाला त्यांच्या कारचा हलका धक्का लागला. त्यानंतर संबंधित वाहनचालकाने मोबाईलवरून फोन करून चार ते पाच तरुणांना घटनास्थळी बोलावून घेतले आणि गोपाल धारस्कर यांच्यावर मारहाण केली. घटनेनंतर गोपाल धारस्कर यांनी आपले मित्र प्रफुल शेलके यांना मदतीसाठी घटनास्थळी बोलावले. मात्र हल्लेखोरांनी प्रफुल शेलके, गोपाल धारस्कर, गोपाल यांचा मुलगा तसेच प्रफुल यांच्यासोबत आलेल्या दोन मित्रांनाही मारहाण केली. यावेळी हल्लेखोरांनी गळ्यातील सोनसाखळी व मोबाईल फोन हिसकावून घेत फरार झाले. या मारहाणीत जखमी झालेल्या गोपाल धारस्कर व प्रफुल शेलके यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी रुग्णालयात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. गोपाल धारस्कर हे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कार्यरत असल्याची माहिती आहे. प्रकरणाची माहिती मिळताच लोणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश खेडकर यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. लोणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पोलीस असल्याचे भासवून लुटीचा प्रयत्न

■ नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

■ अवघ्या काही तासांत दुसरा प्रकार

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि. 13) -** शहरात पोलीस असल्याचे भासवून सोन्याची लूट करण्याचे प्रकार पुन्हा उघडकीस आले असून, नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील दादाजी धुनीवाले दरबाराजवळ शुक्रवारी दुपारी ही घटना घडली.

महेश कॉलनी येथील रहिवासी दर्पण करीया यांचे आई-वडील सुमारे दुपारी 1.15 वाजता दर्शनासाठी जात असताना दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार संशयितांनी त्यांना अडवले. त्यातील एकाने स्वत:ला पोलीस असल्याचे सांगत ओळखपत्र दाखवण्याचा प्रयत्न केला, तर दुसऱ्याने समोरच लुटमार झाली आहे, एवढे सोने कशासाठी घातले आहे? असे विचारून त्यांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला. मात्र संशय आल्याने संबंधित वृद्ध दांपत्याने प्रसंगावधान राखत तात्काळ मंदिराच्या कंपाऊंडमध्ये धाव घेतली. त्यामुळे



संशयितांचा डाव फसला आणि संभाव्य लूट टळली. संशयितांपैकी एक उंच, गोऱ्या रंगाचा असून खाकी रंगाची पँट परिधान केल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे याच दिवशी सकाळी सुमारे 9.30 वाजता माळोदे बिछायत परिसरातही अशाच प्रकारची घटना घडली होती. अवघ्या काही तासांत दुसरा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## पोलिस असल्याचे भासवून तिघा वृद्धांची फसवणूक

### चार सोन्याच्या अंगठ्या लंपास | बेनोडा व मोर्शी पोलीस ठाणे हद्दीतील घटना

**अमरावती, (दि. 13)** जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकाच दिवशी पोलिस असल्याचे भासवून तिघा वृद्धांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अंगठ्या सुरक्षित ठेवण्याचे कारण सांगत अज्ञात आरोपींनी वृद्धांकडील खऱ्या सोन्याच्या अंगठ्या घेऊन त्यांना नकली अंगठ्या दिल्या. या तीन घटनांमध्ये सुमारे 1 लाख 47 हजार रुपयांच्या चार सोन्याच्या अंगठ्या लंपास करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे.

बेनोडा हद्दीत दोन घटना

वरुड तालुक्यातील बेनोडा येथील वार्ड क्रमांक 5 मधील रहिवासी दशरथ जंगलूजी खुरसंगे (वय 78) हे बेनोडा बसस्टॉपवर बसले असताना दोन अनोळखी युवक त्यांच्या जवळ आले. त्यांनी स्वत:ला पोलिस असल्याचे सांगत त्यांच्याशी बोलणे सुरू केले. अंगठी सुरक्षित ठेवण्याचे आमिष दाखवून त्यांच्या हातातील 6 ग्रॅम सोन्याची (किंमत सुमारे 15 हजार रुपये) अंगठी घेतली व त्यांना नकली अंगठी दिली. दुसरी घटना गाडेगाव ते हातुर्णा फाट्याजवळ घडली. वरुड तालुक्यातील आलोडा येथील रहिवासी सहाबराव महादेवराव गावंडे (वय 77) हे रस्त्यालगत उभे असताना दुचाकीवरून आलेल्या दोन युवकांनी स्वत:ला पोलिस सांगत त्यांच्याकडील 5 ग्रॅम सोन्याची (किंमत सुमारे 12 हजार रुपये) अंगठी घेऊन फरार झाले. या दोन्ही घटनांबाबत बेनोडा पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

#### मोर्शी-पाळा मार्गावरही फसवणूक

तिसरी घटना मोर्शी पोलीस ठाणे हद्दीतील मोर्शी-पाळा मार्गावर घडली. येरला येथील रहिवासी शेतकरी शालिकराम खैरकर (वय 76) हे सालबर्डीहून पाळा मार्गाने जात असताना दोन दुचाकींवरून आलेल्या चार युवकांनी त्यांना अडवले. पोलिस असल्याचे भासवून बोलण्यात गुंतवत त्यांच्या हातातील 7 व 8 ग्रॅम अशा दोन सोन्याच्या अंगठ्या (किंमत सुमारे 1 लाख 20 हजार रुपये) घेऊन आरोपी फरार झाले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

#### एकाच टोळीचा संशय

एकाच दिवशी सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत घडलेल्या या तीनही घटनांमागे एकाच टोळीचा हात असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. अशा प्रकारच्या फसवणुकीत कुख्यात ईराणी टोळी सक्रिय असल्याची शक्यता तपासात व्यक्त होत आहे.

#### आरोपींचा शोध सुरू

बेनोडा येथे दोन व मोर्शी येथे एक अशा तीन घटना घडल्या असून आरोपींची ओळख पटवण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, अशी माहिती ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांनी दिली आहे.

## अवैध वाळू तस्करीतील जप्त ट्रक तहसील कार्यालयातून चोरी

**अमरावती :** अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करत जप्त करण्यात आलेला ट्रक अमरावती तहसील कार्यालयाच्या पार्किंगमधूनच चोरून नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. महसूल विभागातील महिला अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपी गजानन काळपांडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संकेत कॉलनी येथील 45 वर्षीय महिला अधिकाऱ्यांनी 3 डिसेंबर रोजी पथकासह कारवाई करत अवैध वाळू वाहतूक करणारा एमएच 40 / वाय 3193 क्रमांकाचा ट्रक जप्त केला होता. हा ट्रक अमरावती तहसील कार्यालयाच्या पार्किंगमध्ये उभा करण्यात आला होता. 11 डिसेंबर रोजी सायंकाळी 8 वाजता कार्यालयातील कर्मचारी रामानंद सरस्वती यांनी फोनद्वारे संबंधित महिला अधिकाऱ्यांना ट्रक पार्किंगमध्ये नसल्याची माहिती दिली.

## चाकू बाळगून फिरणारा आरोपी शहर गुन्हे शाखेच्या ताब्यात

### नागपुरीगेट परिसरात कारवाई; दोन चाकू जप्त

**अमरावती, (दि. 13) -** अमरावती शहरातील सराईत गुन्हेगारांवर पाळत ठेवून प्रभावी कारवाई करण्याच्या पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार अमरावती शहर गुन्हे शाखेने चाकू बाळगून फिरणाऱ्या एका आरोपीस ताब्यात घेतले आहे. ही कारवाई नागपुरीगेट परिसरात करण्यात आली.

13 डिसेंबर 2025 रोजी गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीदाराकडून माहिती मिळाली की, शेख सलमान शेख सलीम (वय 31, रा. म्हाडा कॉलनी, नवी वस्ती बडनेरा; ह.मु. अराफत कॉलनी, डी.एड. कॉलेजजवळ, नागपुरीगेट) हा इसम वाहेद खान डी.एड. कॉलेज समोरील रस्त्यावर हातात लोखंडी चाकू घेऊन संशयास्पदरीत्या फिरत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन मोठ्या शिताफीने आरोपीस ताब्यात घेतले. त्याच्या झडतीदरम्यान एक चायना चाकू व एक लोखंडी चाकू, असा एकूण 2 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध नागपुरीगेट पोलीस ठाणे येथे आर्म्स अ‍ॅक्ट कलम 4/25 तसेच मपोका कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, श्याम घुगे व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, तसेच गजानन ढेवले, मंगेश परिमल, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मिर्झा नईम बेग, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, प्रभात पोकळे या अंमलदारांचा सहभाग होता.

# जिल्ह्यातील घरांसाठी 5 हजार अतिक्रमण नियमानुकूल

### शहरीसह ग्रामीण भागातील नागरिकांना लाभ

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.13) -** सर्वांसाठी घरे उपलब्ध होण्यासाठी शासन स्तरावरून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये नागरी भागातील प्रामुख्याने 2011 पूर्वी अतिक्रमण असल्यास ते नियमानुकूल करण्यात येत आहे. जिल्ह्यातील 5 हजाराहून अधिक अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली आहे. याचा लाभ शहरीसह ग्रामीण भागातील नागरिकांना झाला आहे.

सर्वांसाठी घरे या योजनेच्या माध्यमातून आजअखेर अमरावती महापालिकेमध्ये एकूण 2 हजार 812 अतिक्रमण नियमानुकूल करून हक्काचे घर देण्याबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये 920 लाभार्थ्यांना या माध्यमातून जमिनीची मालकी उपलब्ध करून घरकुल मंजूर केले आहे. ग्रामीण भागातील बाराशे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सर्वांसाठी घरे हा अतिशय स्तुत्य उपक्रम केंद्र शासनाने हाती घेतला आहे. या उपक्रमातून समाजातील सर्व घटकांना घरे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने देखील हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून घरासाठी अनुदान मंजूर होण्यास पात्र असणारे, मात्र ज्यांच्याकडे स्वत:ची जागा नाही, अशा व्यक्तींसाठी महापालिका, नगरपालिका आणि ग्रामीण क्षेत्रातील दि. 1 जानेवारी 2011 पूर्वीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजना, रमाई योजना, घरकुल योजनेंतर्गत घर मिळण्यास पात्र आहे. मात्र त्यांच्याकडे स्वत:ची जागा नसल्याने त्यांना शासनाच्या घरांसाठी योजनेचा लाभ घेता येत नाही, अशा व्यक्तींचे शासकीय जमिनीवर दि. 1 जानेवारी 2011 पूर्वी अतिक्रमण अस्तित्वात असल्याचे पुरावे दिल्यास सदरचे अतिक्रमण नियमानकुल करण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना स्वत:ची हक्काची जागा व त्यावर शासनामार्फत विविध योजनेच्या माध्यमातून घर मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. जिल्ह्यामध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदरची योजना युद्ध पातळीवर पूर्ण करणे बाबत निर्देश दिले.

सदर योजनेमध्ये उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्याने अडचण निर्माण झाली. याबाबत पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी महसूल मंत्री म्हणून शासन स्तरावर पाठपुरावा केला. सदरचा स्थगिती आदेश रद्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उच्च न्यायालयामध्ये अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केली. परिणामी उच्च न्यायालयाने सदर स्थगिती आदेश उठवला आहे. त्यामुळे ही योजना राबवण्यामधील मोठी अडचण दूर झाली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी देखील ही योजना प्राधान्याने राबवण्यावर भर दिला आहे. मागील आठवड्यात महापालिकेच्या समितीने सादर केलेल्या 305 पात्र लाभार्थ्यांच्या यादीला जिल्हाधिकारी यांनी एका दिवसातच मंजुरी दिली आहे.

ज्यामुळे महापालिकेतील समितीने पात्र केलेले सर्व प्रकरणे जिल्हास्तरावरील समितीने मान्यता देऊन त्यांना पट्टेवाटप करण्याचा मार्ग खुला केला आहे. आजमितीस जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबत एकही प्रकरण प्रलंबित नाही. सदर योजना ही अत्यंत लाभदायी असल्याने या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका व जिल्हा प्रशासनाने केले आहे.

#### पट्टेवाटप करण्याचा मार्ग मोकळा

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पट्टेवाटप कार्यक्रमाचे अनुषंगाने सोमवार, दि. 8 डिसेंबर रोजी अमरावती मनपाकडून आठ वसाहती मधील 305 पात्र लाभार्थ्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी संवेदनशीलता दाखवून सदर प्रस्ताव मंजुरीच्या अनुषंगाने तात्काळ दि. 9 डिसेंबर रोजी बैठक घेऊन या प्रस्तावांना मान्यता दिली. यामुळे 305 लोकांना तात्काळ घरकुलकरीता शासकीय पट्टेवाटप करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## चांदूर रेल्वे उपविभागाला अत्याधुनिक मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनची भेट

### पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते लोकार्पण

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,(दि.13) -** चांदूर रेल्वे उपविभागीय पोलीस कार्यालयात अत्याधुनिक मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण अमरावती विभागाचे पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते, तर पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या उपस्थितीत गुरुवारी (ता. 11) पार पडले. उपविभागीय अधिकारी अनिल पवार यांनी मान्यवरांचे स्वागत केले. पोलिस दलाच्या सलामीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विधीवत पूजनानंतर व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले.

गुन्हे तपास अधिक अचूक आणि वेगवान करण्यासाठी ही फॉरेन्सिक व्हॅन अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे पोकळे यांनी सांगितले. पूर्वी घटनास्थळी पुरावे



संकलनात तांत्रिक मर्यादा असल्याने तपासात विलंब होत असे.

मात्र, नवीन व्हॅनमध्ये न्यायवैद्यकीय, भौतिक, रासायनिक, जैविक आणि डिजिटल पुरावे तत्काळ व वैज्ञानिक पद्धतीने गोळा करण्याची क्षमता उपलब्ध आहे. प्रशिक्षित तंत्रज्ञ, आवश्यक रसायने आणि आधुनिक उपकरणांनी सज्ज ही सुविधा उपविभागातील सर्व पोलिस ठाण्यांना मिळणार आहे. यामुळे सात वर्षांपर्यंतच्या शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये दोष सिद्धीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला डीवायएसपी दिनेश शेळके, चांदूर रेल्वे, तिवसा, धामणगाव, कुऱ्हा, तळेगाव दशासर आणि मंगरूळ दस्तगीर येथील ठाणेदार तसेच पोलिस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# : ऊर्जा संवर्धन : शाश्वत भविष्यासाठीची सामूहिक जबाबदारी

दरवर्षी १४ डिसेंबरला भारतात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ ऊर्जा बचतीच्या तांत्रिक चर्चा करण्यापुरता मर्यादित नाही; तर तो समाजाच्या एकूण जीवनशैलीतील, विकासाच्या नमुन्यातील, आर्थिक-सामाजिक असमानतेतील, पर्यावरणीय प्रश्नांतील आणि सांस्कृतिक आचरणातील खोलवर असलेल्या नात्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे.

-------------

ऊर्जा संवर्धन म्हणजे फक्त बल्ब बदला, उपकरणे बंद करा अशा पातळीवर पाहण्याचा विषय नाही; तर तो व्यापक अर्थाने समाजशास्त्रीय क्रांतीचा केंद्रबिंदू आहे. ऊर्जा ही आधुनिक समाजाची मूलभूत जीवनवाहिनी आहे. औद्योगिक प्रगती, शहरीकरण, तांत्रिक विकास, वाहतूक, कृषी, आरोग्य, शिक्षण, माहिती संचार व्यवस्था या सर्व क्षेत्रांचा पाया ऊर्जेवरच घडतो. त्यामुळे ऊर्जेचा अनावश्यक वापर, तिची अपुरी उपलब्धता, वाढती मागणी आणि पर्यावरणीय हानी हे सर्व घटक एकमेकांशी गुंतागुंतीने जोडलेले आहेत.

या संदर्भात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा ठरतो, कारण तो आपल्याला विचार करायला भाग पाडतो की ऊर्जा वापराचा प्रश्न हा केवळ तांत्रिक नाही, तर समानता, न्याय, पर्यावरणीय शाश्वतता, राज्यकारभार, सामाजिक सवयी, सांस्कृतिक मूल्ये आणि सामूहिक जबाबदारी या व्यापक चौकटींशी संबंधित आहे.

भारत सारखा जलद गतीने विकसित होणारा देश ऊर्जा वापराच्या सर्वाधिक असमतोल असलेल्या देशांपैकी एक मानला जातो. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये ऊर्जा उपलब्धतेत स्पष्ट तफावत आढळते. शहरी मध्यमवर्गीय कुटुंबे एसी, रेफ्रिजरेटर, हिवाळी व गरमी व्यवस्थापन यंत्रणा, आधुनिक गृहोपयोगी साधने मोठ्या प्रमाणात वापरतात, तर अनेक ग्रामीण कुटुंबांना अद्याप स्वच्छ ऊर्जा, नियमित वीज पुरवठा किंवा परवडणारी उपकरणे मिळालेली नाहीत.

हा सामाजिक अन्याय ऊर्जा संवर्धनाच्या चर्चेत महत्त्वाचा बनतो, कारण शाश्वततेचे ध्येय गाठण्यास समानता ही अनिवार्य अट आहे. ऊर्जा बचत ही सर्वांनी करायची असते; परंतु सर्वांना समान सुविधा दिल्याशिवाय ऊर्जा शिस्त शक्य नाही. एका बाजूला काही गट ऊर्जेचा अतिरेक वापर करत असताना, इतरांचा ऊर्जेवरील मूलभूत हक्कच बाधित होतो. त्यामुळे ऊर्जा संवर्धन ही सामाजिक पुनर्वाटपाचीही प्रक्रिया ठरते.

ऊर्जेचा प्रश्न पर्यावरणीय न्यायाच्या चौकटीतही स्थान मिळवतो. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, वाहनांमुळे, खनिज इंधनांवरील अवलंबित्वामुळे प्रदूषणाची पातळी वाढत चालली आहे. हवामान बदल ही केवळ पर्यावरणाची समस्या नाही, तर ती आरोग्य, कृषी, रोजगार, स्थलांतर, पाणीटंचाई, संसाधनांवर तणाव, सामाजिक संघर्ष आणि असमानता यांना थेट प्रभावित करते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ऊर्जा संवर्धन ही लोकांच्या दैनंदिन जीवनशैलीत परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. कोणत्याही धोरणाची यशस्वी अंमलबजावणी तेव्हाच शक्य होते जेव्हा सामान्य नागरिकांच्या मानसिकतेत, वर्तनामध्ये आणि मूल्य प्रणालीमध्ये बदल घडतो.

भारतीय समाजात ऊर्जा वापराकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. काही कुटुंबे अजूनही विजेचा काटकसरीने वापर करतात. दुसरीकडे, अधिक साधनसंपन्न कुटुंबे उपकरणांच्या प्रमाणात व वापरात वाढ करतात. येथे ऊर्जा संवर्धन मानसिकता ही सामाजिक समतेशी जोडली जाते. समाजात ऊर्जा वापराबाबत जागरूकता समान नसल्यामुळे संवर्धनाचे प्रयत्न असमतोल राहतात.

ऊर्जा क्षेत्रातील बदल हे तांत्रिक नवकल्पनांशीही जोडलेले आहेत. परंतु समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की तंत्रज्ञानाचा स्वीकार हा सामाजिक रचनेवर अवलंबून असतो. एलईडी बल्ब, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, सौरऊर्जा पॅनेल, ऊर्जा बचत तंत्र या सर्व गोष्टी उपलब्ध होऊ शकतात; पण समाजात आर्थिक क्षमता, जागरूकता, शिक्षण, सांस्कृतिक मूल्ये, प्राधान्यक्रम यांमध्ये भेद असल्यामुळे या साधनांचा वापर सर्वत्र समान पातळीवर होत नाही.

तांत्रिक प्रगती तेव्हाच प्रभावी ठरते जेव्हा ती सर्वांसाठी उपलब्ध आणि परवडणारी बनते. म्हणून सरकारचे ऊर्जा कार्यक्षमता ब्युरो व ऊर्जा संवर्धन कायदा २००१ ही तांत्रिक बाबींपलीकडे जाऊन सामाजिक स्तरावर बदल घडविण्याचा प्रयत्न करतात.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ऊर्जा स्टार रेटिंग, उर्जा बचत योजना, एलईडीचे मोठ्या प्रमाणातील वितरण, सौरऊर्जा प्रकल्प, घरांमध्ये स्मार्ट मीटर बसवणे हे सर्व उपक्रम ऊर्जा बचतीला एका नवीन सामाजिक पातळीवर नेतात. शाश्वत ऊर्जेकडे वाटचाल करण्यासाठी ऊर्जेच्या वापराबाबत घराघरात वैज्ञानिक दृष्टी वाढवणे अत्यावश्यक आहे.

ऊर्जा संवर्धनाच्या प्रश्नात ग्रामीण भारताचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. ग्रामीण कुटुंबांच्या जीवनात अजूनही पारंपरिक इंधनांचा वापर आढळतो. तथापि, सौरऊर्जा, जैवऊर्जा, लघु जलविद्युत प्रकल्प यांसारख्या साधनांमुळे ग्रामीण भाग भारताच्या ऊर्जा क्रांतीचे नवीन केंद्र बनू शकतो.

ग्रामीण भागातील स्वयंसहाय्य गट, ग्रामपंचायत, सहकारी संस्था, महिला मंडळे, शालेय विद्यार्थी या सर्वांचा सहभाग ऊर्जा संवर्धनाच्या कार्यक्रमात निर्णायक ठरतो. ग्रामीण महिलांचे याबाबत योगदान लक्षणीय आहे.

ऊर्जा संवर्धनाचा प्रश्न शिक्षण क्षेत्राशीही घट्ट जोडलेला आहे. शिक्षण संस्थांमध्ये ऊर्जा बचतीबाबत अभ्यासक्रम, प्रकल्प, शालेय उपक्रम, ऊर्जा क्लब, सौरऊर्जेच्या वापराची प्रात्यक्षिके हे सर्व विद्यार्थीवर्गात शाश्वत विचार रुजवतात. शिक्षणातून विकसित झालेली विचारशैली समाजाला दीर्घकालीन ऊर्जा संस्कृती प्रदान करते. त्यामुळे शिक्षणक्षेत्राचे योगदान ऊर्जा संवर्धनातील सर्वांत प्रभावी गुंतवणूक मानली जाऊ शकते.

ऊर्जा बचतीच्या संदर्भात सामाजिक वर्तन आणि सांस्कृतिक पद्धती यांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. आधुनिक जीवनशैलीच्या विस्तारामुळे विलासी वापराची प्रवृत्ती वाढली आणि ऊर्जेच्या खपात झपाट्याने वाढ झाली. परंतु आता पुन्हा ऊर्जा शिस्तीकडे वळणे ही काळाची गरज आहे. सांस्कृतिकदृष्ट्या ऊर्जा बचत ही नैतिक जबाबदारी अशी भावना समाजात वाढवणे आवश्यक आहे. ऊर्जा बचत ही केवळ सरकारी उपक्रमापर्यंत मर्यादित न राहता, ती सामाजिक आंदोलन होणे गरजेचे आहे.

ऊर्जा संवर्धनाचे आर्थिक पैलूही तितकेच महत्त्वाचे आहेत. ऊर्जा आयातीवरील वाढता खर्च, इंधन दरांतील चढ-उतार, उद्योगांची ऊर्जा-आधारित उत्पादन संरचना, शहरी पायाभूत सुविधांवरील दडपण, आर्थिक असमानता या सर्व गोष्टी भारताच्या विकास योजनांवर परिणाम करतात.

जर ऊर्जा बचत वाढली तर देशाचा परकीय चलन खर्च कमी होईल, उद्योगक्षेत्र स्पर्धात्मक बनेल, शाश्वत रोजगार निर्मिती होईल आणि आर्थिक पातळीवर देश अधिक स्थिर बनेल. म्हणून ऊर्जा संवर्धन ही केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक क्रांतीचीही पायरी आहे.

ऊर्जा संवर्धन ही राजकीय धोरणांचीही कसोटी आहे. शासनाने ऊर्जा बचतीसाठी कडक नियम केले आणि नागरिकांनी त्यांचे पालन केले तरच ऊर्जा सुरक्षिततेचे ध्येय साध्य होईल. ऊर्जाक्षेत्रातील पारदर्शकता, ऊर्जा कार्यक्षमतेच्या मानकांची सक्ती, प्रदूषण नियंत्रणाच्या धोरणांची काटेकोर अंमलबजावणीह, ऊर्जा क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधनासाठी गुंतवणूक हे घटक ऊर्जा संवर्धनाला गती देतात. शासन आणि नागरिक यांचे नाते जितके मजबूत, तितके ऊर्जा बचतीचे धोरण यशस्वी होते.

पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. जागतिक तापमानवाढ, पर्जन्यमानातील अस्थिरता, दुष्काळ-पुरांचे प्रमाण, हवामान आपत्ती, जैवविविधतेचा ऱ्हास या सर्व गोष्टींचे मूळ मानवी क्रियाकलापांमध्ये आणि त्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेच्या अनियंत्रित वापरात आहे. ऊर्जा बचत म्हणजे पर्यावरणाचे रक्षण, समाजातील दुर्बलांना संरक्षण, भविष्यातील पिढ्यांबद्दल कर्तव्य पार पाडणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वाला योगदान देणे.

ऊर्जा संवर्धनाला समाजातील अनेक घटकांचा सहभाग आवश्यक आहे. कुटुंब, शाळा, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, उद्योगक्षेत्र, ग्रामपंचायती, शहर विकास संस्था, धार्मिक समूह, स्थानिक समुदाय या सर्वांनी केलेला प्रयत्न ऊर्जा संवर्धनाला जनआंदोलनाचा स्वर देऊ शकतो. माध्यमांचीही जबाबदारी तितकीच महत्वाची आहे.

अखेरीस, राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन हा केवळ दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही; तर तो आपली सामूहिक जबाबदारी स्मरण करून देणारा मूल्यवान क्षण आहे. ऊर्जा बचतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक असायला हवा. आजच्या पिढीने ऊर्जा बचतीचे तत्त्व स्वीकारले तरच उद्याच्या पिढीसाठी सुरक्षित, शाश्वत, न्याय्य आणि पर्यावरणपूरक भविष्य घडवता येईल.

# अखेर जागे झाले अण्णा!



महाराष्ट्राच्या राजकारणात दोन गोष्टी कधीच बदलत नाहीत..सरकारची गाढ झोप आणि अण्णा हजारे यांची उपोषणाची अलार्म क्लॉक!

दोन वर्षांपासून लोकायुक्त कायदा एखाद्या सरकारी फाईलसारखा धूळ खात पडला होता. फाईलवर फक्त बाबूंच्या बोटांचे ठसे आणि सरकारच्या आश्वासनांचा वास. ज्या सरकारने २०२२-२३ मध्ये दोनदा विधेयक मंजूर केले, त्यांना कदाचित वाटत असेल की मंजुरी म्हणजे अंमलबजावणी! पण अण्णा हजारे यांनी त्यांच्या अनुभवी डोळ्यांनी हे सरकारी गणित ओळखलं, कागदावर क्रांती, जमिनीवर शांतता!

आता अण्णा म्हणतात...बस! आता पुरे. लोकायुक्त कायदेचं जेवण पचत नसेल तर मी उपोषण करतो! आणि थेट तारीख जाहीर केली ३० जानेवारी २०२६. राळेगण सिद्धीतील यादव बाबा मंदिर आता पुन्हा एकदा आंदोलनाच्या रंगमंचात परिवर्तित होणार!

**राजन पारकर**
**मुंबई.**

सरकारला ही तारीख ऐकून जरा धडधड झाली असेल. कारण अण्णा उपोषणावर बसले की दिल्लीपासून मुंबईपर्यंत मंत्री लोकांच्या काळजात धडधड सुरू होते. जनलोकपालच्या आठवणी अजूनही सत्ताधाऱ्यांच्या पोटात कळा आणतात. २०११ च्या आंदोलनाने अर्ध्या देशाची सरकारं हलली होती आणि उरलेली पलटी झाली होती.

आता पुन्हा एकदा तोच आवाज... भ्रष्टाचारमुक्त भारत. पण सरकारचे अवघडलेले चेहरे सांगतात... अण्णा! तुम्ही उपोषण करा, आम्ही आयोग नेमतो. तुम्ही उपोषण तोडा, आम्ही सुधारणा करतो. नंतर त्या सुधारणा अंमलात न आणता विसरतो!

**तपोवनातील वृक्षतोड.. सरकारचा कुंभ तर अण्णांचे कुंभकर्ण जागरण**

नाशिकमध्ये तपोवनातील झाडे तोडण्याचा घाट घातला जातोय. सरकारची भूमिका सोपी... कुंभमेळा आला की झाडं अडथळा वाटतात. अण्णांची भूमिका त्यापेक्षाही सोपी... कुंभ असो वा कुंभकर्ण, झाडं तोडू नका! लहान झाड चालतील, पण मोठ्या झाडांना कुऱ्हाड नको.

सरकारला कदाचित झाडंही आंदोलनकारी दिसत असावी, शांतपणे उभी राहिली तरी सरकारला त्रास,आणि तोडली की जनता रागावते!

लोकायुक्त सुधारणा विधेयक,
फडणवीसांनी सादर केले, पण अंमलात सरकार गायब.

विधान परिषदेत लोकायुक्त सुधारणा विधेयक बहुमताने पारित, राष्ट्रपती मान्य, सुधारणा ठरल्या, मुख्यमंत्रीही लोकायुक्तांच्या कक्षेत येणार म्हणे. पण सरकारची कार्यवाही मात्र कक्षेबाहेर!

लोकायुक्त कायदेचं अंमलबजावणीचं मूलभूत गणित सरकार विसरलं... कायद्याला जन्म दिला म्हणजे पालकत्व संपत नाही! दोन वर्षे सरकारने कायद्याला पाळण्यात झोपवलं, आणि आता म्हणतात...अंमलबजावणी होईल, लवकरच अभ्यास सुरू आहे. सरकारी अभ्यास म्हणजे काय? तर एखादी फाईल टेबलवरून दुसऱ्या टेबलावर नेण्याचा खेळ!

**अण्णा जागे; सरकार झोपेतच!**

अण्णा हजारे पुन्हा उपोषणावर बसणार म्हणजे सरकारने पुन्हा जागे झाल्याचे नाटक सुरू करायचे, पत्रकार परिषद घ्यायची. सुधारणा समिती नेमायची, शिष्टमंडळ पाठवायचं,आश्वासन द्यायच, आणि पुन्हा झोपा काढायच्या!

अण्णा म्हणाले... उपोषणाला बसण्याची वेळ आली आणि महाराष्ट्र म्हणतो... अरे हो! सरकारला जागवणारा एकच अलार्म–अण्णा! सरकारची झोप इतकी गाढ की कोणीही उठवू शकत नाही, पण अण्णा उपोषणावर बसले कीच त्यांच्या कानावर घंटा वाजते. वेधक प्रश्न असा की, काय अण्णा उठवतील की सरकार पुन्हा बहाण्यांच्या चादरीत शिरून झोपेल?

■ ■ ■

## सोन्याची जुनी सरकारी योजना फायद्याची की नवीन योजना

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**





गेल्या अनेक महिन्यांपासून आपण सविस्तर गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम बद्दल सविस्तर चर्चा करत आहोत. आज आपण बघणार आहोत की गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम आणि गोल्ड डिपॉजीट स्कीम मध्ये जनतेला जास्त फायदा कशात आहे.

आज ही लोकांच्या घरात सोनं असच पडलेल आहे ते जर सोनं बँकेत या योजनेत ठेवलं तर त्यांना डबल फायदा मिळु शकतो. एक तर सोन्यावर व्याज मिळेल तर दुसरा फायदा म्हणजे सोन्यावर वाढलेली किंमत (भाव) म्हणजेच भांडवली नफा ही मिळेल.

**प्रश्न :** या सरकारी योजनेत कंपनी पैसे ठेवुन तुमच्या आमच्या किंवा व्यक्ती सारखे पैसे गुंतवू शकतात का?

■ होय, कंपनी यात पैशाची गुंतवणूक करून व्याज आणि भांडवली नफा दोन्ही चा फायदा घेऊ शकतात.

**प्रश्न :** जुन्या आणि नवीन योजनेत कोणती योजना जनतेच्या जास्त फायद्याची आहे?

■ नवीन योजना जनतेला खूप आणि जास्त परतावा (फायदा) देणारी आहे.

**प्रश्न :** नवीन योजना जास्त फायद्याची म्हण्टले आहे, याचे महत्वाचे फायदे तथा कारणे कोणती आहेत?

■ पहिला फायदा म्हणजे नवीन योजनेचे उद्देश्य दीर्घकालीन आहेत. या मुळे दीर्घकाळात परदेशातून सोन्याची आयात कमी होईल कारण भारताची जनता त्यात व्यक्ती ते कंपनी पर्यंत सर्व जन या योजनेत भाग घेतील असा विश्वास सरकारला आहे.

दुसरा फायदा म्हणजे जुन्या योजनेत तुम्हाला फायदा घ्यायचा असेल तर कमीत कमी अर्धा किलो (५०० ग्रॅम) सोनं ठेवणे हे अनिवार्य होते तर नवीन योजनेत फक्त ३० ग्रॅम सोनं ठेवलं तरी फायदा मिळवता येतो. तिसरा महत्वाचा फायदा असा की जुन्या योजनेत ९० दिवस कमीत कमी लागायचे तर नवीन योजनेत एकादिवसातच बँकेना काम करण्याची सत्ती करण्यात आली आहे.

यामुळे जनतेचे नुकसान होणार नाही. चौथा फायदा म्हणजे दोन्हीच्या कालावधी मध्ये फरक आहे पाचवा फायदा म्हणजे जुन्या योजनेत फक्त सोनच परत मिळेल अशी अट होती परंतु नवीन योजनेत रोख ही मिळेल.

पुढील रविवारी आपण सोन्या बद्दलची नवीन चर्चा करणार आहोत, जी वाचकांच्या व्यवहारात उपयोगी ठरावी.

■ ■ ■

# विरोधी पक्षनेत्याचे वावडे का?

**मुंबई कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

महाराष्ट्र देशातील सर्वात पुरोगामी राज्य आहे असे आपण समजतो. देशाची आर्थिक राजधानी मुंबई ही महाराष्ट्रात आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. महायुतीचे विधानसभेत २८८ पैकी २३५ आमदार असताना विधानसभेत विरोधी पक्षनेता नाही, हे दुर्दैवच.

नागपूर येथे राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात विधानसभा व विधान परिषद अशा दोन्ही सभागृहांमधे विरोधी पक्ष नेते नाहीत असे पाच दशकानंतर प्रथमच घडले असावे. विरोधी पक्ष नेता नसेल तर जनतेचा आवाज प्रभावीपणे कोण उठवणार? सरकारच्या बेलगाम कारभारावर अंकुश कोण ठेवणार? चुकीच्या निर्णयांवर सरकारला जाब कोण विचारणार?

ठाकरेंची शिवसेना व शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस दुर्बल झाल्यामुळेच राज्यात भाजपाचा विस्तार झाला आहे. राज्यात भाजपा नंबर १ आहे. गेल्या अकरा वर्षात सर्व थरातील मतदार मोठ्या संख्येने भाजपाकडे आकर्षित झाले. विरोधी पक्षांची ताकद विलक्षण कमी झाली. राज्यातील सर्व सत्ता भाजपाकडे एकवटली आहे.

राज्याचे पोलीस व प्रशासन हे संपूर्णपणे भाजपाच्या अखत्यारीत आहे. जनतेने प्रचंड सत्ता दिली म्हणून विरोधी पक्षाला विचारायचे नाही किंवा कमी लेखायचे हे योग्य नव्हे. विरोधी पक्षाला मान सन्मान, अधिकार दिला पाहिजे. लोकांचे प्रश्न पोटतिडकीने मांडणे आणि सरकारच्या बेलगाम कारभारावर अंकुश ठेवणे हे विरोधी पक्षाचे कामच असते. मग महायुती सरकारला विरोधी पक्ष नेत्याचे वावडे कशासाठी आहे?

भाजपाचे नेते वर्षानुवर्षे विरोधी पक्षात होते. भाजपाचा मातृपक्ष जनसंघाने तर नेहमीच विरोधी बाकांवर बसून जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवला. त्यामुळे विरोधी पक्षांचे महत्व हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांनाही चांगले ठाऊक आहे. मग विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष नेता समोर का नसावा? विधानसभेत विरोधी पक्ष नेता कोण असावा हे अध्यक्ष ठरवतात व विधान परिषदेत विरोधी पक्षनेतो कोण असावा हे सभापती ठरवतात, असे उत्तर देऊन सरकारला जबाबदारी झटकता येणार नाही.

संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन्ही चाके मजबूत असली पाहिजेत, त्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विरोधी नेता , असला पाहिजे, या भूमिकेतून सरकारने मनाचा मोठेपणा दाखवला पाहिजे. विरोधी पक्षनेता ही सुध्दा राज्याची मोठी परंपरा आहे. ही परंपरा खंडीत झाली आहे, म्हणे , सभागृहातील सदस्य संख्येच्या दहा टक्केपेक्षा जास्त आमदार असतील तर विरोधी पक्षाला नेतेपद मिळेल, असे सत्ताधारी पक्षातून रोज सांगितले जाते. खरंच असा कुठे नियम आहे काय?

लोकसभेचा विरोधी पक्षनेता ठरवताना, या संकेताची अंमलबजावणी केली जाते पण राज्याच्या विधिमंडळात हा संकेत किंवा नियम नाही अशी अनेक उदाहरणे आहेत, पहिल्या लोकसभेचे अध्यक्ष जी. व्ही. मावळंकर यांनीच विरोधी पक्षनेतेपद देताना दहा टक्के सदस्य संख्या असावी असे म्हटले होते, तेव्हापासून तो संकेत लोकसभेत पाळला जातोय.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी बाकांवर निवडून आलेल्या काँग्रेस पक्षाचे केवळ ४२ खासदार होते, नंतर २०१९ मधे काँग्रेसचे ५२ खासदार निवडून आले. दहा टक्के सदस्य संख्या म्हणजेच ५५ खासदार नसल्याने काँग्रेसला मोदी सरकारने विरोधी पक्षनेते पद दिले नव्हते. २०२४ मधे काँग्रेसचे ९९ खासदार निवडून आले व महाराष्ट्रातून सांगलीतून अपक्ष म्हणून निवडून आलेल्या विशाल पाटील यांनी काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला. लोकसभेत राहुल गांधी विरोधी नेते झाले.

लोकसभा कामकाज पध्दतीचे सर्व नियम राज्यात लागू नाहीत. विधानसभेत अगदी सात आठ आमदार असलेल्या विरोधी पक्षालाही विरोधी पक्षनेतेपद दिल्याची राज्यात उदाहरणे आहेत. सरकारचा मोठेपणा तेव्हा दिसला मग आज का दिसत नाही ?

स्वातंत्र्यपूर्व मुंबई राज्यात मुस्लिम लिगचे अलि मोहंमद खान व नंतर ए ए खान हे विरोधी पक्षनेते होते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई राज्यात सुरूवातीला अ. भा. मुस्लिम लिगचे ए ए खान व नंतर शेकापचे तुळशीदास जाधवविरोधी नेते होते.

व्दिभाषिक मुंबई राज्यात सुरूवातीला श्रीधर महादेव जोशी (प्रजा समाजवादी पक्ष), नंतर उध्दवराव पाटील (शेकाप) , विठ्ठल देविदाल देशपांडे ( भाकपक्ष) हे विरोधी पक्षनेते होते.

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर कृष्णराव धुळूप, दिनकर बाळू पाटील, गणपतराव देशमुख, उत्तमराव पाटील, प्रभा राव , प्रतिभा पाटील, शरद पवार, बबनराव ढाकणे, निहाल अहंमद, दत्ता पाटील, मृणाल गोर, मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे, मधुकर पिचड, नारायण राणे, रामदास कदम, एकनाथ खडसे ( भाजपा ), एकनाथ शिंदे ( शिवसेना ), राधाकृष्ण विखेपाटील ( काँग्रेस ) , विजय वडेट्टीवार ( काँग्रेस ) , देवेंद्र फडणवीस ( भाजपा ), अजित पवार ( राष्ट्रवादी काँग्रेस ) अशी विरोधी नेत्याची मोठी परंपरा आहे.

विरोधी पक्षनेता म्हणून प्रभावी कामगिरी बजावलेले शरद पवार, मनोहर जोशी, नारायण राणे, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, गोपीनाथ मुंडे, एकनाथ शिंदे व अजित पवार हे उपमुख्यमंत्री झाले. मनोहर जोशी हे नंतर लोकसभेचे अध्यक्षही झाले आणि प्रतिभा पाटील या देशाच्या राष्ट्रपती झाल्या.

संसदीय लोकशाहीमधे विरोधी पक्षनेता हा खऱ्या अर्थाने पाहरेकरी म्हणून काम करीत असतो. विरोधी पक्षनेता जेवढा सजग आणि जागृक असेल तेवढी लोकशाही सशक्त बनते. सरकारकडे प्रचंड बहुमत असेल तर सरकारच्या बेलगाम कारभारावर चाप लावण्याचे काम विरोधी नेता करतो. विरोधी पक्षनेत्याचा सरकाला धाक वाटला पाहिजे. आपण चुकीचे केले तर विरोधी पक्षनेता आपल्याला फाडून खाईल अशी भिती वाटली पाहिजे. देवेंद्र फडणवीस, गोपीनाथ मुंडे, नारायण राणे, रामदास कदम, दि. बा, पाटील, दत्ता पाटील, मृणाल गोरे, अशा नेत्यांची विरोधी बाकांवरील भाषणे आणि त्यांनी विचारलेले प्रश्न सरकारला कापरे भरवत असत. विरोधी पक्षनेता हा शॅडो चीफ मिनिस्टर म्हणून ओळखला जातो. विरोधी पक्षनेता हे घटनात्मक पद आहे, त्याला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा आहे. कोणत्याही खात्याची माहिती तो मागवू शकतो. विधिमंडळात कोणत्याही विषयावर बोलण्यासाठी त्याला प्राधान्य दिले जाते. विरोधी नेता हा सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातला सेतू असतो. जनतेचा प्रभावी आवाज असतो. जनहिताचे निर्णय घेण्यास तो सरकारला भाग पाडू शकतो.

१९६२ मधे २६४ पैकी २१५ आमदार काँग्रेसचे निवडून आले होते, शेकाप चे १५ आमदार होते, तरीही शेकापचे कृष्णराव धुळूप हे विरोधी पक्षनेते होते. १९६७ मधे २७० सदस्याच्या सभागृहात शेकापचे १९ आमदार होते, पण धुळूप हे विरोधी नेते होते. १९७२ मधे शेकापचे ७ आमदार होते, पण दिनकराव पाटील यांना विरोधी पक्षनेतेपद दिले.

१९८१ मधे २८८ सदस्यांच्या सभागृहात जनता पक्षाचे १७ आमदार होते, पण बबनराव ढाकणे यांना विरोधी नेतेपद दिले. १९८८ मधे जनता पक्षाचे २० आमदार होते, मृणाल गोरे विरोधी पक्षनेत्या होत्या. विधिमंडळात विरोधी पक्षाच्या आमदाराची संख्या कमी असली तरी दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेते देऊन सरकारने संसदीय लोकशाहीच्या परंपरेचा सन्मान राखला पाहिजे.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## अंमली पदार्थांचा अड्डा म्हणजे सनबर्न फेस्टिव्हल

शासनाचा महसूल बुडणारा व युवकांना अमली पदार्थांचे सेवन करायला लावुन मृत्युच्या खाईत लोटणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हल चे आयोजन भारतात आवश्यक आहे का?

वर्ष २००७ मध्ये सुरू झालेल्या सनबर्न फेस्टिव्हल मुळे वाद निर्माण होउन अमली पदार्थांच्या अति सेवनाने युवकांचे मृत्यूस कारणीभूत ठरणारा सनबर्न फेस्टिवल आता १९ डिसेंबर तर २१ डिसेंबर या कालावधीत मुंबई येथे होणार आहे.या फेस्टिव्हल ला गोव्यामध्ये सामाजिक संस्था, स्थानिक नागरिकांनी, नेत्यानी तीव्र विरोध केला आहे.

या फेस्टिवलच्या आयोजकानी गोवा सरकारचा ६.२९ कोटीचा महसूल बुडवला.मुंबई उच्च न्यायालयाने सनबर्न फेस्टिव्हलची १ कोटी १० लाख रु. ची सुरक्षा ठेव जप्त करण्याचा आदेश दिला. या कार्यक्रमात अति उच्च आवाजाच्या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदुषण होउन त्याचा त्रास स्थानिक रहिवासी, वृध्द लोक,आणि रुग्ण, विद्यार्थी यांना होत असल्याने मानसिक संतुलन बिघडणे, अभ्यासातील एकाग्रता ढळणे असे घातक परिणाम होउ शकतात. कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणेवर ताण येतो, गुन्हेगारी, चोरी, बलात्कार सारख्या घडण्याऱ्या घटना बाबत विचार होणे गरजेचे आहे. शासनाचा महसूल बुडवणारा, युवकांना अमली पदार्थांच्या खाईत लोटणारा व त्यांच्या मृत्यूला कारण ठरू शकणारा सनबर्न फेस्टिव्हल भारतातुन कायम हद्दपार करणेच योग्य होईल आणि अशा कार्यक्रमांना अनुमतीच नाकारणे गरजेचे आहे.

■ **शशिकांत पाध्ये, वर्धा.**

## बरे झाले.. आठवडाभरात गुंडाळले ते...

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन यावर्षी केवळ एक आठवडा कालावधीचे होते. या सात दिवसात सभागृहात काय काय झाले? विदर्भाच्या किती प्रश्नावर चर्चा झाली? विदर्भातील किती आमदारांनी जनसामान्यांचे प्रश्न मांडले ते राज्यभरातील जनतेने पाहिलेच आहे. अनेकदा हा प्रश्न विचारला जातो की, नागपूर येथे अधिवेशन घ्यायचेच कशाला? मंत्री, आमदार, अधिकारी यांच्या सरबराईसाठी कोट्यवधीचा खर्च होतो आणि तो सत्कारणी न लागता वाया जातो. नागपूरचे अधिवेशन म्हणजे यांच्यासाठी केवळ पिकनीक असते. यात सर्वाधिक त्रास होतो तो पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना. यावेळी कमी कालावधीमुळे त्यांचा त्रास वाचला. बरे झाले, अधिवेशन आठवडाभरात संपते आहे ते.

■ **सिद्धार्थ सोनवाने, नागपूर.**

# हिवाळ्यातील सुपरफूड आवळा



हिवाळ्यातील हंगामी फळांचा विचार केला तर आवळा हा व्हिटॅमिन सीचा सर्वोत्तम स्रोत मानला जातो. हिवाळ्यात तुमच्या आहारात आवळा समाविष्ट केल्याने आरोग्य चांगले राखण्यास मदत होते, कारण ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. आवळा चटणी, लोणचे, जाम आणि कँडी अशा विविध पदार्थ बनवण्यासाठी आवळ्याचा वापर केला जातो. अशातच आवळा चाऊन खाणे चांगले आहे की त्याचा रस पिणे अधिक फायदेशीर आहे?

आवळा हा प्राचीन काळापासून औषध म्हणून वापरला जात आहे, कारण आयुर्वेदात ते पॉवरफूल औषधी गुणधर्म असलेले फळ मानले जाते, म्हणूनच आयुर्वेदिक संयोजन त्रिफळा मध्ये समाविष्ट केले आहे. चला त्याचे फायदे, पोषक तत्वे आणि ते खाण्याची योग्य पद्धत जाणून घेऊया.

**आवळ्यामध्ये किती पोषक तत्वे असतात?**

वेब एमडीच्या मते , आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन ए, लोह आणि कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. त्यात प्रथिने आणि फायबर देखील असतात. शिवाय आवळा हा अनेक पॉवरफूल अँटिऑक्सिडंट्स आणि वनस्पती-आधारित संयुगांचा स्रोत आहे.

**आवळा खाणे कसे फायदेशीर आहे?**

आवळा कच्चा चावणे त्याचा रस पिण्यापेक्षा जास्त फायदेशीर आहे. आवळा चावल्याने लाळेत मिसळते, ज्यामुळे पचन सुधारते. त्यामुळे दात, हिरड्या आणि जबड्यांचा व्यायाम देखील होतो. आवळा चावल्याने चेहऱ्याचे स्नायू देखील सक्रिय होतात.

**आवळ्याचे फायदे**

हेल्थलाइनच्या मते, आवळा खाल्ल्याने तुमची त्वचा तरुण राहू शकते, कारण व्हिटॅमिन सी हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे पेशींना नुकसान होण्यापासून वाचवते आणि कोलेजन उत्पादनात देखील मदत करते, म्हणूनच ते तुमची त्वचा नैसर्गिकरित्या तरुण ठेवण्यास मदत करते.

**केस निरोगी होतील**

केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी आवळा प्राचीन काळापासून वापरला जात आहे. तो केसांना लावणे आणि खाणे हे दोन्ही तुमच्या केसांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्यामुळे केसांची वाढ होण्यासही मदत होऊ शकते. आवळा केवळ फायदेशीर नाही तर एक स्वादिष्ट फळ देखील आहे.

**डोळ्यांसाठी फायदेशीर**

आवळा डोळ्यांच्या पेशींचे मायटोकॉन्ड्रियल आरोग्य सुधारून वयाशी संबंधित समस्यांपासून संरक्षण करतो.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## राजकारण..!

**इर्षा द्वेष अहम्‌चं**
**बी मनात रुजतय**
**म्हणून काटछाटीचं**
**कारस्थान उदयास येतं ..**

**इर्षा द्वेष अहमं करते**
**वातावरण प्रदुषित**
**इथुनच सुरु होते**
**व्यक्तिच्या अधोगतीस ..**

**ईश चरणी करू या प्रार्थना**
**प्रज्वलीत होऊ द्या**
**हृदयी आमच्या**
**विश्वबंधुत्वाची भावना!**

## हिंदुस्तान झिंकने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवली, जी दरवर्षी सुमारे १९,००० घरांना वीज पुरवण्यासाठी पुरेशी आहे



**नागपूर, १३ डिसेंबर :** भारतातील एकमेव आणि जगातील सर्वात मोठी एकात्मिक झिंक उत्पादक हिंदुस्तान झिंक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवून हवामान कृतीसाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त, कंपनीने राजस्थानमधील त्यांच्या कामकाजातून हरितगृह वायू उत्सर्जनात २०,००० टनांपेक्षा जास्त कार्बन उत्सर्जन कमी केल्याचा अहवाल दिला. कंपनी ऊर्जा-कार्यक्षमता आणि डीकार्बोनायझेशन प्रयत्नांवर भर देत आहे.
हिंदुस्तान झिंकने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवली, जी अंदाजे १९,००० भारतीय घरांच्या वार्षिक वीज वापराइतकी आहे. ही तुलना ऊर्जा मंत्रालयाच्या अंदाजावर आधारित आहे की एक सरासरी भारतीय कुटुंब दरवर्षी अंदाजे १,५३३ किलोवॅट वीज वापरते. ही तुलना औद्योगिक ऊर्जा कार्यक्षमतेचा राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेवर आणि दैनंदिन जीवनावर किती ठोस परिणाम होतो हे दर्शवते.
हिंदुस्तान झिंकचे सीईओ अरुण मिश्रा म्हणाले, आमचा प्रवास एका साध्या पण दृढ विश्वासाने चालवला जातो: भविष्यातील खाणी केवळ आपण काय बांधतो यावर अवलंबून नसून आपण त्या किती जबाबदारीने आणि शहाणपणाने बांधतो यावर अवलंबून असतील. ऊर्जा कार्यक्षमता, विद्युतीकृत लॉजिस्टिक्स आणि अक्षय ऊर्जा आपल्याला कमी-कार्बन जगासाठी खाणकामाची पुनर्कल्पना करण्यास मदत करत आहेत. आपण ऊर्जा संवर्धन दिन साजरा करत असताना, शाश्वत खाणकामात नवीन जागतिक बेंचमार्क स्थापित करण्याची आणि भारत आणि ग्रहासाठी दीर्घकालीन मूल्य निर्माण करणारी औद्योगिक परिसंस्था तयार करण्याची आपली वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त करतो.
हे टप्पे या वर्षीच्या मजबूत शाश्वत प्रगतीवर आधारित आहेत. आर्थिक वर्ष २५ च्या सुरुवातीला, हिंदुस्तान झिंकने ६.७ लाख टन गिगाहर्ट्झ उत्सर्जन बचत नोंदवली, अक्षय ऊर्जेचा वापर त्याच्या पॉवर मिक्सच्या अंदाजे १९ टक्क्यांपर्यंत वाढवला आणि सलग तिसऱ्या वर्षी एस अँड पी ग्लोबल कॉर्पोरेट सस्टेनेबिलिटी असेसमेंटने जगातील सर्वात शाश्वत धातू आणि खाण कंपनी म्हणून स्थान मिळवले.

## मॅक्स हॉस्पिटलने गडचिरोलीत विशेष ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट ओपीडी सेवा सुरू केली



**गडचिरोली, १३ डिसेंबर :** मॅक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूरने आज यशोदा मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर, आशिर्वाद नगर, गडचिरोली मध्ये आपली विशेष ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट ओपीडी सेवा सुरू केल्याची घोषणा केली. या ओपीडी सेवांचा शुभारंभ डॉ. प्रशिक शेंडे, असोसिएट कन्सल्टंट ऑर्थोपेडिक आणि जॉइंट रिप्लेसमेंट, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर यांच्या उपस्थितीत करण्यात आला.
डॉ. प्रशिक शेंडे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी दुपारी १२ ते २ वाजता गडचिरोली येथील आशिर्वाद नगर, यशोदा मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअरमध्ये प्राथमिक सल्ला आणि फॉलो-अपसाठी उपलब्ध राहतील.
डॉ. प्रशिक शेंडे, असोसिएट कन्सल्टंट ऑर्थोपेडिक आणि जॉइंट रिप्लेसमेंट, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, अनेक रुग्ण सुरुवातीची लक्षणे जसे की सतत किंवा तीव्र गुडघे किंवा सांध्यात वेदना, हालचालींमध्ये कडकपणा, सूज, जळजळ, दैनंदिन काम करताना त्रास, सांध्याची विकृती किंवा अस्थिरता, आणि पारंपरिक उपचारांवर पुरेसा परिणाम न होणे याकडे दुर्लक्ष करतात.
डॉ. शेंडे यांनी असेही सांगितले, रॉबोटिक पद्धतींमुळे उपचार अधिक सोपे आणि सुरक्षित झाले आहेत. यामुळे शस्त्रक्रियेतील दुखापत कमी होते, बरे होण्याचा कालावधी कमी होतो आणि शस्त्रक्रियेची अचूकता वाढते. तज्ञांशी लवकर संपर्क साधल्यास रुग्णांना अधिक आराम मिळतो आणि उपचारही परिणामकारक ठरतात. आता गडचिरोली आणि आसपासच्या भागातील रुग्णांना रॉबोटिक उपचारांसह तज्ज्ञ उपचार सहज मिळू शकतील.
गडचिरोलीत या ओपीडी सेवांचा शुभारंभ करून मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूरने प्रगत ऑर्थोपेडिक उपचार रुग्णांपर्यंत सुलभपणे पोहोचवण्याची आपली वचनबद्धता पुन्हा सिद्ध केली आहे. यामध्ये वेळेवर निदान, प्रतिबंधक काळजी आणि रॉबोटिक सहाय्याने केलेले जॉइंट रिप्लेसमेंटसारखे आधुनिक उपचार भर देत, या उपक्रमाचा उद्देश रुग्ण आणि तज्ज्ञ उपचार यांच्यातील अंतर कमी करणे हा आहे.

## एचडीएफसी बँकेने बाबा नानक, सिंधी हिंदी हायस्कूल, नागपूर येथे फ्रॉड अवेयरनेस वर्कशॉपचे आयोजन केले



**नागपूर, १३ डिसेंबर :** भारताची आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक असलेल्या एचडीएफसी बँकेने डिजिटल बँकिंग जागरूकता मोहिमेचा एक भाग म्हणून, नागपूरच्या मंगलवारी येथील बाबा नानक सिंधी हिंदी हायस्कूलमध्ये सुरक्षित बँकिंग वर्कशॉपचे आयोजन केले. या सत्राचा उद्देश शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल आवश्यक माहिती देऊन जागरूक करणे हा होता.
या संवादात्मक सत्राद्वारे, ३५० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबद्दल उपयुक्त माहिती मिळाली.
वर्कशॉपबद्दल बोलताना, श्री. मनीष अग्रवाल, सिनियर एक्झिक्युटीव्ह वाइस प्रेसिडेंट क्रेडिट इंटेलिजन्स अँड कंट्रोल, एचडीएफसी बँक, म्हणाले, आज आपण जास्तीत जास्त व्यवहार डिजिटल पद्धतीने करतो. त्यामुळे फसवणूक करणारे कोणकोणत्या पद्धती वापरतात आणि सुरक्षित बँकिंगसाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबत नागरिकांना जागरूक करणे खूप महत्त्वाचे आहे.
सुरक्षित बँकिंग वर्कशॉपचा उद्देश शाळा, महाविद्यालये, ग्राहक, पोलिस विभाग, ज्येष्ठ नागरिक, स्वयं-सहाय्य गट, शैक्षणिक संस्था, विक्रेते, भागीदार आणि कर्मचारी यांसारख्या विविध गटांना सुरक्षित बँकिंगबाबत जागरूक आणि शिक्षित करणे हा आहे.
बँकेने ग्राहकांना डिजिटल व्यवहार करताना सावध राहण्याचे आणि सुरक्षित बँकिंगच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले आहे. तसेच आपली गोपनीय बँकिंग माहिती कोणालाही शेअर करू नये, असे सांगितले आहे. जर एखादा ग्राहक ऑनलाइन फसवणुकीचा बळी ठरला, तर अनधिकृत व्यवहार तात्काळ बँकेला कळवून कार्ड/ यूपीआय/नेटबँकिंग ब्लॉक करून घ्यावे, जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल. ग्राहकांनी गृह मंत्रालयाने () सुरू केलेल्या १९३० या हेल्पलाइनवर कॉल करून तक्रार नोंदवावी, तसेच नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल https://www.cybercrime.gov.in वरही तक्रार नोंदवावी. याशिवाय, संशयास्पद किंवा फसवणुकीसंबंधी कॉल आणि मेसेजेसची माहिती चक्षु पोर्टल किंवा संचार साथी https://sancharsaathi.gov.in/ मोबाइल ॲपवर देण्याचा सल्ला देण्यात आला.

## प्रीमियम एसयूव्ही - एक्सयूव्ही 7XO साठी महिंद्राचे प्री-बुकिंग, १५ डिसेंबरला दुपारी १२ वाजेपासून

**मुंबई, १३ डिसेंबर :** भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज त्यांच्या हाय-टेक, ट्रेंडसेटर, प्रीमियम एसयूव्ही एक्सयूव्ही 7XO साठी प्री-बुकिंग सुरू करण्याची घोषणा केली. १५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून हे प्री-बुकिंग सुरू होणार आहे. ग्राहक बराच काळ या गाडीच्या प्रतीक्षेत होते. या एसयूव्ही साठी २१००० च्या बुकिंग रकमेसह ग्राहक लवकर बुकिंगची सुविधा घेऊ शकतात.
प्री-बुकिंगच्या वेळी ग्राहकांना त्यांच्या पसंतीची डीलरशिप, इंधन प्रकार आणि ट्रान्समिशन निवडण्याची संधी मिळेल. एक्सयूव्ही 7XO पेट्रोल आणि डिझेल या दोन इंधन पर्यायांसह सादर केले जाईल. तसेच मॅन्युअल आणि ऑटोमॅटिक या ट्रान्समिशनच्या दोन्ही पर्यायांसह उपलब्ध आहे. सर्व महिंद्र डीलरशिप आणि कंपनीच्या ऑनलाइन चॅनेलवर प्री-बुकिंगची सुविधा उपलब्ध असेल.
अपडेट्स आणि नोंदणीसाठी, भेट द्या:
एक्सयूव्ही 7XO साठी सोशल मीडिया हॅण्डल्स:
ब्रँड वेबसाइट: महिंद्रा एक्सयूव्ही 7XO, इन्स्टाग्राम: महिंद्रा एक्सयूव्ही 7XO, ट्विटर: महिंद्रा एक्सयूव्ही 7XO, यूट्युब: महिंद्रा एक्सयूव्ही 7XO, फेसबूक: महिंद्रा एक्सयूव्ही 7XO.

## 'गणेश कार्तिकेय' मालिकेत भगवान शिवाच्या भूमिकेत अविनेश रेखी शक्ती आणि भावनांचे गहिरेपण यांचा उत्तम समतोल घेऊन येत आहे



**मुंबई, १३ डिसेंबर :** सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही पौराणिक मालिका भगवान शिवाच्या दिव्य परिवाराचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ही मालिका श्रद्धा आणि मूल्ये यांच्या कालातीत कथा सादर करते आणि ब्रह्मांडातील पहिल्या कुटुंबाच्या कहाण्या अशा दृष्टिकोनातून सादर करते, की त्या प्रेक्षकांना आपल्याशा वाटतात.
या लोकप्रिय मालिकेला नवीन परिमाण देण्यासाठी सुपरिचित अभिनेता अविनेश रेखी आता शंकराच्या भूमिकेत दाखल होत आहे. या भव्य-दिव्य व्यक्तिरेखेतील बारकावे साकार करण्याचा त्याचा प्रयत्न असेल. जबरदस्त स्क्रीन प्रेझेन्स आणि भावनिक गहिरेपण याबद्दल ओळखला जाणारा अविनेश शंकराच्या भूमिकेत शक्ती आणि अथांग शांतता यांचा समतोल घेऊन येत आहे. आपल्या अनोख्या शैलीने तो मालिकेचे कथानक नक्कीच अधिक समृद्ध करेल.
या मालिकेत दाखल होण्याबद्दल अविनाश रेखी म्हणतो, भगवान शंकराची भूमिका करणे हा गौरव आहे, तशीच एक जबाबदारीही आहे. या भूमिकेत प्रचंड गहनता आहे आणि भावनिक लक्षणीयता असून शंकराबद्दल कोट्यावधी लोकांच्या मनात पूज्य भाव आहे. या भूमिकेची तयारी करताना हा विचार सतत माझ्या मनात आहे. एक अभिनेता म्हणून, या दिव्य व्यक्तिरेखेत माझे स्वतःचे वेगळेपणे घेऊन येण्यासाठी मी उत्सुक आहे. शंकराच्या व्यक्तिमत्त्वात ज्या भावना, तत्वज्ञान आणि आंतरिक शांतता आहे, ते सारे अभिनयातून टिपण्याचा माझा प्रयत्न असेल. प्रेक्षकांना शंकराच्या शांतीमागची गहनता, कृतीमधील प्रबुद्धता आणि आपला परिवार आणि भक्तमंडळी यांच्याप्रती असलेले प्रेम अनुभवता आले पाहिजे. या मालिकेच्या टीमने माझ्यावर खूप विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. भगवान शिवाचा प्रवास आणि मूल्ये यांच्या माध्यमातून प्रेक्षकांशी संलग्न होण्यास मी खरोखर आतुर आहे.

## काँग्रेसच्या पराभवाचे कारण मतदार यादी नाही तर त्यांचे नेतृत्व आहे



**मुंबई, १३ डिसेंबर :** केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी निवडणूक सुधारणांवरील चालू चर्चेला निर्णायक वळणावर आणले तेव्हा लोकसभेच्या सभागृहात राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय घडला. ही सामान्य चर्चा नव्हती - तर भारताच्या लोकशाही, विरोधी राजकारण आणि निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर एक कथनात्मक बदल होता, ज्यामध्ये विरोधी पक्षांच्या दाव्यांची केवळ चाचणीच झाली नाही तर ती चकनाचूरही झाली.
संसदेतील वातावरण त्या क्षणी बदलले जेव्हा तथ्ये, इतिहास आणि टीका हे सर्व एकत्र विरोधकांच्या अनेक वर्षांच्या कथांना उधळून टाकत होते. गेल्या चार महिन्यांपासून, विरोधक एसआयआर बद्दल खोटेपणा पसरवून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होते, परंतु जेव्हा रणनीती आणि अभ्यासात अतुलनीय असलेले शाह सभागृहात आले तेव्हा संपूर्ण विरोधक स्तब्ध झाले. भारतीय राजकारणाला एक नवी ओळख देणाऱ्या शहा यांनी विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला त्यांच्या धारदार शैलीत तथ्यांसह उत्तर दिले. विरोधक ईव्हीएम आणि मतदार यादीवर आरोप करत असताना, २००४ मध्ये पहिल्यांदाच ईव्हीएम वापरून लोकसभा निवडणुका घेण्यात आल्या आणि काँग्रेस जिंकली तेव्हा कोणालाही मशीनमध्ये काही दोष का आढळला नाही हे सभागृहात शहा यांच्या भाषणांनी सिद्ध केले. २००९ मध्ये ईव्हीएम जिंकले तेव्हाही ते 'पवित्र' राहिले, परंतु २०१४ पासून ते हरू लागले तेव्हा प्रत्येक निवडणुकीत पराभवासोबत ईव्हीएम 'दोषी' बनले. शहा यांचे सर्व युक्तिवाद एकाच दिशेने इशारा करत होते: काँग्रेसच्या पराभवाचे कारण पक्षाचा निवडणूक प्रचार किंवा मतदार यादी नव्हती, तर त्याचे नेतृत्व होते. आज, देशाला माहित आहे की मोदी सरकारच्या कृती - सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राइक, कलम ३७० रद्द करणे, सीएए लागू करणे, राम मंदिर बांधणे, तिहेरी तलाक रद्द करणे आणि घुसखोरी रोखणे - यामुळे विरोधकांची राजकीय स्थिती कमकुवत झाली आहे.
इतिहासाचे विद्यार्थी आणि स्वतः राजकारणाचे विद्यार्थी असलेल्या अमित शहा यांचे संदर्भ सभागृहात गुंजले. पहिली घटना, मतांची चोरी - सरदार पटेल यांना २८ मते आणि जवाहरलाल नेहरूंना फक्त २ मते मिळाली असूनही नेहरू पंतप्रधान झाले. दुसरी घटना, अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक अवैध घोषित केल्यानंतर, हा निर्णय रद्द करण्यासाठी संसदेत एक कायदा आणण्यात आला. तिसरी घटना, सोनिया गांधी यांचे नाव नागरिक होण्यापूर्वी मतदार यादीत नोंदल्याचा आरोप करणारा चालू खटला. विरोधकांना हा इतिहास कधीच आवडत नाही, म्हणून जेव्हा जेव्हा इतिहासावर चर्चा होते तेव्हा ते नेहमी वॉकआउट करतात. यावेळी पुन्हा असेच घडले; घुसखोरांचा मुद्दा उपस्थित होताच विरोधक अचानक सभागृहातून पळून गेले.
शाह यांच्या भाषणानंतर, हे स्पष्ट झाले की भारताच्या राजकारणात खरा संघर्ष दोन धोरणांमध्ये आहे. एनडीएचे धोरण स्पष्ट आहे: कायदेशीर प्रक्रियेद्वारे घुसखोरांना ओळखणे, काढून टाकणे आणि हद्दपार करणे म्हणजे (शोधणे, हटवणे आणि हद्दपार करणे). याउलट, विरोधी पक्षांचे धोरण घुसखोरीला सामान्य मान्य करून त्याला कायदेशीर करणे आणि नंतर मतदार यादीत नोंदणी करून ते कायमस्वरूपी करणे (म्हणजेच नॉर्मलाइझ, व्हॅलिडेट आणि फॉर्मलाइझ) आहे. या फरकावरून देशाच्या सुरक्षेसोबत कोण उभे आहे आणि कोण वोट-बँकसाठी उभे आहे हे स्पष्ट होते.

## या हिवाळ्यात आपल्या त्वचेची काळजी घ्या कॅलिफोर्निया बदामांसह : ऋतिका सामद्दार



**मुंबई, १३ डिसेंबर :** हिवाळा आल्यानं आपल्याला आनंदाचे आणि उबदार रात्रींचे अनुभव मिळतात, पण त्यासोबतच अनेकांसाठी एक परिचित आव्हानही येते: कोरडी, नीरस आणि संवेदनशील त्वचा. थंड हवेने आपल्या त्वचेतील ओलावा काढून टाकतो, ज्यामुळे त्वचा खुरखुरीत आणि जळजळणारी होऊ शकते. टॉपिकल स्किनकेअर काही मदत करू शकते, पण टिकाऊ पोषण अंतःस्रोतापासून सुरू होते. आहारतज्ज्ञ ऋतिका सामद्दार सांगतात की हिवाळ्यातील त्वचेची काळजी घेण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शरीराला योग्य अन्न देणे.
ती स्पष्ट करते की हिवाळ्यातील कोरडेपणा हा फक्त त्वचेची काळजी घेण्याचा प्रश्न नाही, तर तो पोषणाशीही संबंधित आहे. ती प्रथिने, निरोगी फॅट्स, व्हिटॅमिन इ आणि ओमेगा-३ यांनी समृद्ध अन्नाचे महत्त्व अधोरेखित करते, जसे की फॅटी फिश आणि कॅलिफोर्निया बदाम. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्यास त्वचेला आतून पोषण मिळते, ज्यामुळे ती कोमल, हायड्रेटेड आणि निरोगी राहते, अगदी कठीण हवामानातही.
बदाम हे आवश्यक पोषक तत्त्वांनी समृद्ध आहेत जे त्वचेच्या आरोग्यास अनेक मार्गांनी आधार देतात. हे व्हिटॅमिन इ चे एक समृद्ध नैसर्गिक स्रोत आहेत, जे एक महत्त्वपूर्ण अँटिऑक्सिडंट आहे आणि त्वचेला हानीपासून संरक्षण देते. व्हिटॅमिन इ त्वचेची नैसर्गिक आडथळा क्षमता मजबूत करते, ज्यामुळे त्वचा ओलसर राहते आणि कठीण हिवाळ्यातही मऊ राहते. याशिवाय, व्हिटॅमिन इ मध्ये अँटी-एजिंग गुणधर्मही आहेत जे त्वचेला लवचिकता टिकवण्यास मदत करतात.
कॅलिफोर्निया बदाम हिवाळ्यासाठी आवश्यक असण्याचं आणखी एक कारण म्हणजे त्यातील निरोगी मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सची जास्त मात्रा. हे निरोगी फॅट्स अंतर्गत ओलावा देणारे म्हणून काम करतात, त्वचेची लवचिकता वाढवतात आणि अति कोरडेपणा टाळतात. यामुळे त्वचा फुललेली आणि मऊ दिसते, तसेच थंड हवामानात दिसणाऱ्या सूक्ष्म रेषा कमी होतात.
बदाममध्ये प्रथिने, रिबोफ्लेविन आणि झिंक देखील भरपूर प्रमाणात असतात, जे त्वचेच्या एकूण आरोग्यासाठी योगदान देतात. हे सर्व पोषक घटक एकत्रितपणे चमक पुनर्संचयित करण्यास, निस्तेजपणा कमी करण्यास आणि त्वचेच्या मजबूत अडथळ्याला आधार देण्यास मदत करतात. संशोधनात असेही सूचित केले आहे की बदाम नियमितपणे खाल्ल्याने चेहऱ्याच्या त्वचेचा रंग सुधारण्यास आणि सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.
रितिका आतड्यांचे आरोग्य आणि त्वचेचे आरोग्य यांच्यातील दुवा देखील दर्शवते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की बदाम आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात, ज्यामुळे जळजळ आणि ब्रेकआउट्स कमी होऊ शकतात. हिवाळ्यात, जेव्हा पचन समस्या अधिक सामान्य असतात, तेव्हा हे विशेषतः उपयुक्त ठरते. ती दररोजच्या जेवणात कॅलिफोर्निया बदाम घालण्याची आणि पोषक तत्वांचे शोषण वाढवण्यासाठी सकाळी ते खाण्याची शिफारस करते.
या हिवाळ्यात चमकदार त्वचेसाठी महागडे उपचार किंवा क्लिष्ट रूटीन आवश्यक नाहीत. कधी कधी सर्वात प्रभावी सौंदर्य उपाय साध्या, रोजच्या आहारातच असतात. त्यांच्या उत्कृष्ट पोषक तत्वांच्या गुणधर्मांमुळे, कॅलिफोर्निया बदाम आपल्या त्वचेची नैसर्गिक, प्रभावी आणि स्वादिष्ट पद्धतीने काळजी घेण्याचा मार्ग देतात.

## इव्होनिथ स्टीलने वर्ध्यात कम्युनिटी स्पोर्स डे चे आयोजन केले, ज्यात २० गावांमधील १,००० हून अधिक लाभार्थी झाले सहभागी



**नागपूर, १३ डिसेंबर :** एव्होनिथ स्टील या अग्रेसर पोलाद उत्पादक कंपनीने ९ आणि १० डिसेंबर रोजी नागपूर येथील वर्धा प्रकल्पात दोन दिवसीय कम्युनिटी स्पोर्ट डे चे यशस्वी आयोजन केले, ज्यामुळे समाज कल्याण, शारीरिक तंदुरुस्ती आणि सामाजिक समावेशकता यांप्रती असलेली आपली वचनबद्धता अधिक दृढ झाली. या उपक्रमामुळे आसपासच्या २० गावांमधील लाभार्थी एकत्र आले आणि क्रीडा, सलोखा व सामूहिक सहभागासाठी एक उत्साही व्यासपीठ निर्माण झाले.
या कार्यक्रमात खो-खो, कबड्डी आणि क्रिकेटसह विविध पारंपरिक आणि लोकप्रिय खेळांचा समावेश होता, ज्यामुळे सर्व वयोगटांतील पुरुष आणि महिलांना सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळाले. १,००० हुन अधिक लाभार्थी सहभागी झाल्यामुळे, गेल्या वर्षाच्या तुलनेत सहभाग जवळपास दुप्पट झाला, ज्यामुळे स्थानिक समाजामध्ये खेळ आणि शारीरिक हालचालींबद्दल उत्साह वाढलेला दिसून येतो.
इव्होनिथ स्टीलचे अध्यक्ष जय सराफ म्हणाले, खेळ हा लोकांना एकत्र आणण्याचे नेहमीच एक शक्तिशाली माध्यम राहिला आहे आणि या कम्युनिटी स्पोर्ट डे ने सामाजिक बंध दृढ करण्याची आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्याची त्याची क्षमता सिद्ध केली. इव्होनिथमध्ये, आमचा विश्वास आहे की जबाबदार विकास हा आता आमच्या कार्याच्या पलीकडे जाऊन आम्ही ज्या समुदायांशी जोडलेले आहोत, त्या समुदायांपर्यंत पोहोचतो. सहभागींनी दाखवलेली ऊर्जा आणि उत्साह शारीरिक शिक्षण आणि समाज-नेतृत्व असलेल्या उपक्रमांबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन दर्शवतो.
ही केवळ एक स्पर्धात्मक घटना नसून, या उपक्रमाने ग्रामीण तरुणांमध्ये सक्षमीकरण, लैंगिक समावेशकता आणि आत्मविश्वास वाढवण्यावर भर दिला. महिला आणि तरुण सहभागींना सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणारे सर्वसमावेशक वातावरण निर्माण करून, या कार्यक्रमाने टीमवर्क, समानता आणि आत्मविश्वास या मूल्यांना बळकटी दिली.
गावकऱ्यांकडून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाने या कार्यक्रमाचे यश दिसून आले आहे आणि ज्या प्रदेशांमध्ये कंपनी कार्यरत आहे, त्या प्रदेशांमध्ये महत्त्वपूर्ण सामाजिक प्रभाव निर्माण करण्यावर आणि सर्वांगीण सामाजिक विकासाला पाठिंबा देण्यावर इव्होनिथ स्टीलचा सतत भर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

## अंदमान आणि निकोबार येथील विजयापुरम येथे सागरा प्राण तळमळला या गीताच्या ११६व्या वर्षपूर्तीनिमित्त भव्य ऐतिहासिक सोहळा




**श्री विजयापुरम, अंदमान आणि निकोबार, १३ डिसेंबर :** सागरा प्राण तळमळला या अमर्त्य अशा काव्यपंक्तींनी लाखो भारतीयांच्या हृदयात त्यावेळी राष्ट्रवादाची वात जागवली, या गोष्टीला म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी या ज्या पंक्ती समुद्राच्या लाटांच्या साक्षीने लिहिल्या त्या गोष्टीला आज ११६ वर्षे होऊन गेली आहेत.
या ऐतिहासिक अशा क्षणाच्या निमित्ताने मुंबई येथील व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेटे यांनी सागरा प्राण तळमळला या भव्य अशा सोहळ्याचे आयोजन १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजता अंदमान आणि निकोबार येथील श्री विजयापुरम येथे केले होते. या भव्य अशा सोहळ्यात सावरकरांच्या तेजस्वी आणि भव्य पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.
माननीय मोहन भागवत आणि माननीय अमित शहा हे हृद्य आणि सार्वजनिक अशा या सोहळ्यात एकत्र आल्याने एक दुर्मिळ योग साध्य झाला. एडमिरल (नि) देवेंद्र कुमार जोशी, माननीय लेफ्टनंट गव्हर्नर, श्री विजयापुरम आनंद अंदमान निकोबार आणि महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲडव्होकेट आशिष शेलार हे यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक अमेय हेटे यांचीसुद्धा उपस्थिती होती.
हा पुतळा म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रखर राष्ट्रवादाचे, अजोड त्यागाचे आणि निडर विचारसरणीचे प्रतीक आहे. या पुतळ्याची रचना प्रख्यात शिल्पकार श्री राम सुतार यांची आहे. त्यांना नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
या अनोख्या अशा उपक्रमाबद्दल बोलताना व्हॅल्युएबल ग्रुपचे संस्थापक श्री अमेय हेतेहोते म्हणाले, हा सोहळा म्हणजे केवळ एक सांस्कृतिक सोहळा नसून ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाला वाहिलेली एक मानवंदना आहे. हा भविष्यातील आपल्या पिढ्यांमध्ये राष्ट्रवाद आणि देशभक्ती जागृत करण्याचा एक प्रामाणिक छोटासा प्रयत्न आहे. आमच्यासाठी हा सोहळा गौरवापेक्षा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याप्रति त्यांचा त्याग आणि देशाभक्ती यासाठी आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. जर तुम्हाला आयुष्याच्या धावपळीत हरवलेले वाटत असेल, तर स्वत:साठी थोडा वेळ काढा आणि तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करा.
**वृषभ :** तुमच्या कुटुंबातील ज्येष्ठांकडून तुम्हाला काही प्रेरणा मिळेल. आज तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. व्यवसाय वाढवण्यासाठी नातेवाईक सूचना देतील.
**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य जाईल. अनावश्यक चिंतांपासून मुक्त होऊन तुम्ही मंदिर किंवा धार्मिक स्थळी वेळ घालवाल. आज सहलीला जाण्याची शक्यता आहे, तिथे जपून रहा, तब्येत सांभाळा
**कर्क :** विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु त्यांना अभ्यासात अधिक मेहनत घ्यावी लागेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवू शकाल, ज्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. मन समाधानी असेल.
**सिंह :** नवविवाहित जोडप्यांमध्ये आज गोड गप्पा होतील, ज्यामुळे त्यांच्या नात्यात आणखी गोडवा येईल. आज आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. नाहीतर मोठा फटका बसू शकतो.
**कन्या :** हॉटेल आणि रेस्टॉरंट्ससारख्या व्यवसायात गुंतलेल्या लोकांना आज चांगला नफा मिळेल. आज भरपूर कमाई होईल. चा दिवस जास्त नफा मिळवण्याचा आहे. तुम्हाला वडिलांकडून पाठिंबा मिळेल.
**तुळ :** आज कुटुंबात आनंदी वातावरण असेल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुसंवाद राखल्याने आनंद वाढेल. आज तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहाल. आज तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल.
**वृश्चिक :** आज तुम्हाला नवीन रोजगाराच्या संधी मिळतील. तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल. तुमच्या चांगल्या वागण्यामुळे तुम्हाला समाजात चांगली प्रतिष्ठा मिळेल. आर्थिक लाभ होईल.
**धनु :** आज जपून रहा, तब्येत सांभाळा. व्यवसायासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. तुमचे काम व्यवस्थित पूर्ण होईल. आज तुमच्या दैनंदिन जीवनात काहीतरी नवीन येऊ शकते.
**मकर :** आज तुम्ही काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये संतुलन राखाल. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही नवीन मार्गांचा विचार कराल. तुमच्या जवळच्या नातेवाईकांकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळेल.
**कुंभ :** आज, रखडलेले व्यावसायिक प्रकल्प पुन्हा सुरू केल्याने तुमची व्यस्तता वाढेल. आज नेमलेली कामे वेळेवर पूर्ण करा, अन्यथा वरिष्ठांकडून ओरडा ऐकावा लागू शकतो.
**मीन :** दिवसभर तुम्हाला ताजेतवाने वाटेल. तुमच्याभोवती सकारात्मक ऊर्जा असेल. लोक तुमच्या वागण्याने खूश होतील. आज तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे.

## शब्दकोडे क्रमांक २२९७



**आडवे शब्द :-**
१) फळांचा राजा
३) चहा पिण्याचे जोडसाधन
७) पुंकेसर
९) पद्धतीप्रमाणे
१२) तमाशातील कलावंत
१५) मौज, गंमत
१६) मर्कट
१७) मसाल्यातील पान
१९) एक पालेभाजी
२१) बाराव्या राशीचा जलचर प्राणी
२२) डोळे जड होणे, गुंगी
२३) सोपे
२४) श्वासोच्छवासाची क्रिया
२५) अस्वल
२७) कृष्णसखी
२८) खोडण्याचे साधन
३०) लाकूड कापण्याचे धारदार हत्यार
३१) बाण
३२) शर्त
३५) एकरुप
३७) नवरामुलगा
३८) पालिकेतील लोकप्रतिनिधी
४०) सहाय्यक
४३) नवा (हिं.)
४४) एक जाडसर रेशमाचे कापड
४६) धाक, भीती
४८) सन्मान
५०) प्रफुल्लता
५२) पती, श्रीविष्णू
५३) सुकुमार
५६) बडबड
५७) पोलीस, शेरीफ
५९) घटस्फोट
६१) अनुमती
६२) औषध
६३) मेहरबानी
६४) बैलाच्या मानेवरीज जोखड
६५) मोजणी
६६) हिंमत, शक्ती

**उभे शब्द**
२) लहानसहान
३) सत्व
४) पुन्हा पुन्हा
५) गार
६) निरुपयोगी लोकांची भरती
८) लवकुशाचे वडील
९) गणपती
११) अखेर, शेवट
१३) संपूर्ण
१४) विपत्तीची कहाणी
१६) आईचा भाऊ
१८) नारळाचे झाड
२०) परमेश्वर
२३) चंद्र
२६) दरबारातील मानकरी
२९) भरभराट
३२) फुरसत
३३) चेष्ट
३४) जननमरण
३५) सरसकट
३६) सारखा
३९) आयारामच्या विरुद्ध
४१) ओलसर हवा
४२) निद्रा, झोप
४५) पाणी उकळताना होणारा आवाज
४७) बगळा
४९) गवताची काडी
५१) युद्ध करताना आलेले मरण
५३) फावला वेळ
५४) अफवा
५५) अग्रलेख लिहीणारा
५७) नमस्कार
५८) भांडणे सोडवणारा मध्यस्थ
५९) फणसाचा एक प्रकार
६०) आत्म्याची मुक्ती
६१) कामगारांचा कामावरील बहिष्कार

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# तालुक्यातील पांदण रस्त्यांना भ्रष्टाचाराचे ग्रहण

■ 1 कि.मी.मातीकाम, मात्र 2 कि.मी.चे बिल काढल्याचा आरोप

■ सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदारांच्या संगनमताचा संशय

महासागर | प्रतिनिधी



**चांदूर बाजार,( दि.13 )** – जिल्ह्यात सुमारे आठ वर्षांपूर्वी मोठ्या गाजावाजात पालकमंत्र्यांच्या हस्ते पांदण रस्ते योजनेची सुरुवात करण्यात आली होती. अनेक तालुक्यांत या योजनेअंतर्गत दर्जेदार कामे झाली असली, तरी काही ठिकाणी या योजनेला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागल्याचे चित्र समोर येत आहे. चांदूरबाजार तालुक्यातील एका शिवरस्त्याच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित कंत्राटदार यांच्या संगनमताने गैरप्रकार झाल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सन 2022 मध्ये परसोडा–दुर्गवाडा–बेसखेडा या शिवरस्त्याच्या दोन किलोमीटर पांदण रस्त्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांनी या कामास मंजुरी दिली असून रोजगार हमी योजनेअंतर्गत सुमारे 2 लाख 34 हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सन 2023 मध्ये प्रत्यक्षात मात्र केवळ एक किलोमीटरचेच मातीकाम करण्यात आले. उर्वरित एक किलोमीटर काम 'रस्ता अडविला'असल्याचे कारण पुढे करून अर्धवटच सोडून देण्यात आले.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी काम पूर्ण करण्याची शेतकऱ्यांची मागणी असतानाही विभागाने पावसाळ्यानंतर काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मात्र पावसाळ्याच्या काळात कागदोपत्री दोन किलोमीटर काम पूर्ण झाल्याचे दाखवून सुमारे 2 लाख 30 हजार रुपयांचे पूर्ण बिल कंत्राटदाराच्या नावाने काढण्यात आले. सध्या उर्वरित एक किलोमीटर कामासाठी अवघा चार हजार रुपयांचा निधी शिल्लक असल्याचे समोर आले आहे.

अपूर्ण रस्ता पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा, लेखी तक्रारी व माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासनेही हवेत विरली असून, या प्रकरणी आता एसआयटी चौकशीची मागणी शेतकऱ्यांनी जाहीर केली आहे.

सदर शिवरस्त्याबाबत सविस्तर माहिती घेतली जाईल. महसूल विभागाकडून आखणी मिळाल्यानंतर रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल.

**अभयकुमार बारब्दे,**
**प्रभारी उपविभागीय अभियंता, सा.बां.वि., चांदूर बाजार.**

महसूल व भूमीलेख विभागाने संयुक्तरीत्या दोन वेळा आखणी करून दिली आहे. त्यानुसार काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आहे.

**सोनल सूर्यवंशी**
**तहसीलदार, चांदूर बाजार.**

रस्ता पूर्ण व्हावा म्हणून अर्ज, निवेदने दिली. कंटाळून आमरण उपोषणाची नोटीस दिल्यावर उलट पोलिसांचा ससेमिरा लागला.

**सुधीर काकडे, शेतकरी ( बेसखेडा )**

माहिती अधिकारातूनही माहिती मिळाली नाही. आता 15 डिसेंबर रोजी तालुक्यातील सर्व पांदण रस्त्यांची एसआयटी चौकशी व्हावी, यासाठी निवेदन देणार आहोत.

**सुधीर खुळे, शेतकरी ( बोराळा–दुर्गवाडा )**

# अखेर दोन नायब तहसीलदारांची नियुक्ती

## मात्र संजय गांधी निराधार योजनेसह अनेक पदे अद्याप रिक्त

महासागर | प्रतिनिधी





**नांदगाव खंडेश्वर, ( दि.13 )** – गेल्या अनेक वर्षांपासून नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयात नायब तहसीलदारांसह अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्यामुळे तालुक्यातील सामान्य नागरिकांची शासकीय कामे मोठ्या प्रमाणात रखडली होती. मर्यादित मनुष्यबळावर अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडताना येथील कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण निर्माण झाला होता. या परिस्थितीबाबत वृत्तपत्रांत बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर शासनाने याची गंभीर दखल घेत तहसील कार्यालयात दोन नायब तहसीलदारांची तातडीने नियुक्ती केली आहे.

नियुक्त करण्यात आलेल्यांमध्ये सुनील सुधाकर राठोड यांची निवासी नायब तहसीलदार म्हणून, तर सदानंद देशपांडे यांची महसूल नायब तहसीलदार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे महसूल विषयक कामे, विविध प्रमाणपत्रे, फेरफार, नोंदणी तसेच तक्रार निवारण प्रक्रियेला गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मात्र वृद्ध, दिव्यांग व निराधार महिलांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेच्या नायब तहसीलदाराचे पद अद्याप रिक्तच आहे. त्यामुळे पेन्शनसाठी अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना महिनोन्महिने तहसील कार्यालयाची पायपीट करावी लागत असून आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याशिवाय तहसील कार्यालयात ज्युनिअर क्लर्क, शिपाई, मंडळ अधिकारी (पापड मंडळ) तसेच धामक–बेलोरा, येवती, मंगरूळ चव्हाळा व सातरगाव येथील तलाठी पदे रिक्त आहेत. या पदांच्या अभावामुळे संबंधित गावांतील नागरिकांना वारंवार अडचणींचा सामना करावा लागत आहे. दोन नायब तहसीलदारांच्या नियुक्त्या स्वागतार्ह असल्या तरी उर्वरित रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी तालुक्यातील नागरिकांनी जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडे केली आहे.

### सध्या तहसील कार्यालयात खालील महत्त्वाची पदे रिक्त आहेत

संजय गांधी निराधार योजना = नायब तहसीलदार – 1
ज्युनिअर क्लर्क – 1
शिपाई – 1
मंडळ अधिकारी (पापड मंडळ) – 1
तलाठी – 4 (धामक–बेलोरा, येवती, मंगरूळ चव्हाळा, सातरगाव)

या पदांच्या रिक्ततेमुळे संबंधित गावांतील नागरिकांना शासकीय कामांसाठी सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# थंडीमध्ये मायेची उब; अष्टविनायक पतसंस्थेकडून विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

महासागर | प्रतिनिधी



**वरुड, ( दि.13 )** – मोर्शी तालुक्यातील दहसुर येथील जिल्हा परिषद शाळेत अष्टविनायक नागरी सहकारी पतसंस्था, बेनोडा शहीद यांच्या वतीने विद्यार्थ्यांना स्वेटर वाटपाचा उपक्रम पार पडला. थंडीच्या दिवसांत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची व शिक्षणाची काळजी घेत राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण जिचकार, शाखा व्यवस्थापक मनोज गेडाम, रवींद्र वरखडे व मोहन वहेकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्वेटरचे वितरण करण्यात आले. यावेळी इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या हर्षल उईके या विद्यार्थ्यांने आपल्या भावना व्यक्त करताना, हे फक्त स्वेटर नसून या थंडीत आम्हाला दिलेली मायेची उब आणि आशीर्वाद आहेत, असे मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या या निरागस प्रतिक्रियेमुळे उपस्थितांची मने जिंकली गेली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजली उईके होत्या. तसेच जयश्री धोटे, माजी सरपंच सुरेश भलावी, ममता धुर्वे, दुर्गा पंडागळे व सोनाली मालवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक मनीष धुळे यांनी केले, तर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सोनाली मेहकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. अष्टविनायक नागरी सहकारी पतसंस्थेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसला. सामाजिक जाणीवेतून राबविण्यात आलेल्या अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच माणुसकीचे धडे मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# भाजपच्या शासनकाळात अंजनगाव सुर्जीतील रस्त्यांची दुर्दशा

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.13 )**– भाजपच्या शासनकाळात अंजनगाव सुर्जी नगरपालिकेला शहरातील रस्ते व नाल्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. मात्र, हा निधी योग्य पद्धतीने खर्च न होता भ्रष्टाचारात बुडाल्याने शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचा गंभीर आरोप शिवसेना (उबाठा) चे तालुका प्रमुख कपील देशमुख यांनी केला आहे.



शनिवारी (दि. 13) सहारा नगर येथे आयोजित कार्यकर्ते व नागरिकांच्या बैठकीत त्यांनी हा आरोप केला. त्यांनी सांगितले की, तत्कालीन भाजपप्रणीत नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या कथित 'कमिशनराज'मुळे शहरातील रस्त्यांचा दर्जा घसरला. अनेक रस्ते वारंवार बांधूनही काही दिवसांतच उखडले गेले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. भाजप सरकारच्या काळात आलेल्या निधीतून रस्ते व नाल्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने जनतेच्या लाखो रुपयांचा अपव्यय झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शहरातील रस्ते व नाल्यांची सध्याची स्थिती पाहिल्यास झालेल्या भ्रष्टाचाराचे स्पष्ट चित्र समोर येत असल्याचे देशमुख यांनी नमूद केले. शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत गंभीर असून यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे कपील देशमुख यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# मंदिरांच्या जमिनीसाठी स्टॅम्प ड्यूटी पूर्णतः माफ करा!

मंदिरांच्या जमिनीसाठी स्टॅम्प ड्यूटी पूर्णतः माफ करा!

महासागर | प्रतिनिधी



**चांदूर रेल्वे, ( दि.13 )** – महाराष्ट्रातील मंदिरांच्या जमिनीवरील वाढीव स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क व इतर आर्थिक आकारणी तात्काळ रद्द करून धार्मिक व धर्मादाय संस्थांना संपूर्ण करसवलत द्यावी, अशी ठाम मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा यांनी राज्य शासनाकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन महासंघासह विविध देवस्थान व संस्थान व्यवस्थापन समित्यांनी संयुक्तरीत्या शासनाकडे सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 2023 पासून महाराष्ट्र मंदिर महासंघ राज्यभर मंदिरांचे संघटन, व्यवस्थापन, सुरक्षा व संस्कृती संवर्धनासाठी कार्यरत आहे. आजपर्यंत 15 हजारांहून अधिक मंदिरे महासंघाशी संलग्न झाली आहेत. मात्र मंदिरांना दानरूपाने मिळणाऱ्या किंवा गरजेनुसार खरेदी कराव्या लागणाऱ्या जमिनींसाठी शासनाकडून व्यावसायिक संस्थांप्रमाणे उच्च दराने स्टॅम्प ड्युटी व नोंदणी शुल्क आकारले जात असल्याने हा प्रकार अन्यायकारक असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. पूर्वी दिलेली सूट नाममात्र व अपुरी असल्याने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 मध्ये दुरुस्ती करून पूर्ण करमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

मंदिरे उभारलेली जमीन ही समाजहितासाठीच वापरली जाते. त्यामुळे मंदिरांवर अनावश्यक आर्थिक भार टाकणे योग्य नाही. स्टॅम्प ड्युटी व इतर कर माफ केल्यास मंदिरांचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवता येतील.

**लक्ष्मण राठोड, विश्वस्त, श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा.**

मंदिरे, देवस्थान व धर्मादाय संस्था या शुद्ध भक्तभावनेतून चालतात. कोणताही व्यवसायिक हेतू किंवा नफेखोरी यात नसते. अनेक दानशूर भाविक स्वत:च्या इच्छेने जमीन दानरूपाने देवस्थानांना उपलब्ध करून देतात. तसेच व्यवस्थापन, धार्मिक किंवा सार्वजनिक कामांसाठी (शेती, पायवाट, पाणीपुरवठा, वस्ती सुविधा, भक्तनिवास इ.) मंदिरांना जमीन खरेदी करावी लागते.

**पुंजाराम नेमाडे, अध्यक्ष, श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा.**

# अमरावतीत एआयबीई परीक्षाकेंद्र मंजूर करण्याची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.13 )** – विदर्भातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र असलेल्या अमरावती शहरात ऑल इंडिया बार एक्झामिनेशनचे परीक्षाकेंद्र मंजूर करण्यात यावे, अशी जोरदार मागणी विधीविद्यार्थी व विधीज्ञांकडून होत आहे. या मागणीसंदर्भात ॲड. चैतन्य गायकवाड यांनी बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय), नवी दिल्ली यांना औपचारिक निवेदन पाठवले आहे.

सध्या एआयबीई साठी नागपूर व औरंगाबाद हीच जवळची केंद्रे उपलब्ध असल्याने अमरावतीसह अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना दूरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रवासखर्च वाढणे, मानसिक ताण तसेच परीक्षेच्या दिवशी गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

अमरावती शहर रेल्वे, एसटी व खासगी बससेवेद्वारे उत्तमरीत्या जोडलेले असून येथे अनेक विधी महाविद्यालये व आवश्यक परीक्षा पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा, यासाठी अमरावतीत एआयबीई परीक्षाकेंद्र तातडीने मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गाविलगड शौर्य दिनानिमित्त वार्षिकांकाचे प्रकाशन

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि.13 )**– 1803 साली झालेल्या इंग्रज–मराठा युद्धात गाविलगड किल्ल्यावर झालेल्या पराक्रमाची आठवण जिवंत ठेवण्यासाठी स्वराज्य सेवा प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी 'गाविलगड शौर्य दिन मोहीम' आयोजित करण्यात येते. या मोहिमेअंतर्गत यंदा एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून, 'गाविलगडची गौरवगाथा' हा विशेष वार्षिकांक प्रकाशित करण्यात येणार आहे.




14 डिसेंबर 1803 रोजी गाविलगड किल्ल्यावर इंग्रजांविरुद्ध झालेल्या लढाईत किल्लेदार बेनीसिंह यांच्यासह अनेक मराठा सैनिकांनी धारातीर्थी पतन पत्करले. स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी बेनीसिंह यांच्या पत्नीसह किल्ल्यावर असलेल्या स्त्रियांनी जोहार करून बलिदान दिले. या ऐतिहासिक घटनेच्या स्मृती जागवण्यासाठी शौर्य दिन मोहिमेदरम्यान धारातीर्थी पडलेल्या मराठा शूरवीरांना आदरांजली वाहिली जाते. यासोबतच किल्ल्याची स्वच्छता करण्यात येते आणि बागलिंगा गावापासून सुमारे तीन किलोमीटरची पदभ्रमण मोहीमही आयोजित केली जाते.यंदा प्रसिद्ध होणाऱ्या 'गाविलगडची गौरवगाथा' या वार्षिकांकात इतिहास अभ्यासकांचे संशोधनपर व अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. गाविलगड किल्ल्याचा इतिहास, बांधणी, शिल्पकला, युद्धप्रसंग तसेच अनेक दुर्लक्षित पैलू या लेखांमधून सविस्तरपणे मांडण्यात आले आहेत. त्यामुळे हा विशेषांक इतिहास संशोधक, किल्लेप्रेमी आणि जिज्ञासू वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. या वार्षिकांकाचे प्रकाशन 14 डिसेंबर 2025 रोजी गाविलगड किल्ल्यावर होणार असून, या निमित्ताने मोठ्या संख्येने शौर्य दिन मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवा काळे आणि सचिव प्रतीक पाथरे यांनी केले आहे.

# दागिण्यांच्या किमतींनी वधूपिता धास्तावला

## सोन्याचे दर तोळामागे 1 लाख 30 हजार, तर चांदीचा भाव सुमारे 1 लाख 75 हजार रुपये

महासागर | प्रतिनिधी



**पथ्रोट, ( दि.13 )** – गेल्या काही दिवसांपासून सोन्या–चांदीच्या किमतींनी उच्चांक गाठला असून, याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. रोजंदारीवर गुजराण करणारे कामगार, मध्यमवर्गीय तसेच शेतकरी कुटुंबांसाठी ही दरवाढ मोठा आर्थिक ताण निर्माण करणारी ठरत आहे. सोनं केवळ गुंतवणूक किंवा संपत्तीचे प्रतीक न राहता, अनेक कुटुंबांच्या आयुष्यभराच्या स्वप्नांचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचा अविभाज्य भाग मानले जाते. मात्र, सध्याच्या प्रचंड वाढलेल्या किमतींमुळे ही स्वप्ने पूर्ण करणे अधिकच अवघड होत चालले आहे.

पारंपरिक भारतीय विवाहसंस्कृतीत सोन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुलीच्या लग्नात दागिन्यांची अपेक्षा ही सामाजिक वास्तव बनली असून, त्यावरच अनेकदा लग्नाची प्रतिष्ठा मोजली जाते. सध्या सोन्याचा दर तोळामागे तब्बल 1 लाख 30 हजार रुपयांपर्यंत पोहोचला आहे, तर चांदीचा भावही सुमारे 1 लाख 75 हजार रुपयांच्या घरात आहे. त्यामुळे लग्नखर्चाचे गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

सोन्या–चांदीच्या दरवाढीमुळे केवळ दागिन्यांचाच नव्हे, तर एकूणच लग्नाचा खर्च प्रचंड वाढला आहे. लग्नासाठी हॉलचे भाडे, पाहुण्यांसाठी जेवणावळ, फोटोग्राफी, वेशभूषा, सजावट तसेच प्रवासाचा खर्च यामध्येही मोठी वाढ झाली आहे. या सर्व खर्चाचा मेळ घालताना अनेक कुटुंबांची कसरत होत आहे. परिणामी अनेकांना बँका, पतसंस्था किंवा वेळप्रसंगी खासगी सावकारांचे दरवाजे ठोठवावे लागत आहेत.

सोन्याच्या वाढत्या किमतींचा परिणाम केवळ आर्थिक मर्यादित न राहता, सामाजिक पातळीवरही गंभीर ठरत आहे. या दरवाढीचे ओझे गरिबांची स्वप्ने, कुटुंबातील सुख–समाधान आणि आर्थिक सुरक्षिततेवर थेट परिणाम करत आहे. त्यामुळे सोन्याचे दर कधी आटोक्यात येणार, याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

### पर्यायांचा स्वीकार आवश्यक

लग्नाच्या परंपरेत सोने महत्त्वाचे असले, तरी आजच्या वास्तव परिस्थितीनुसार पर्यायी मार्ग स्वीकारणे गरजेचे झाले आहे. फॅशन ज्वेलरीचा वापर किंवा कमी प्रमाणात सोन्याचे दागिने करूनही लग्नाची परंपरा जपता येऊ शकते. यामुळे कुटुंब कर्जबाजारी होण्यापासून वाचू शकते. आजची परिस्थिती पाहता, अशी सुरूवात होणे अत्यावश्यक ठरत आहे.

### काय म्हणतात सराफा व्यावसायिक

सोन्याच्या दरवाढीचा थेट परिणाम आमच्या व्यवसायावरही होत आहे. मध्यमवर्गीय आणि शेतकरी कुटुंबांचा सोनं खरेदी करण्याकडे असलेला ओढा लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, असे मत सराफा व्यावसायिकांनी व्यक्त केले.

### वधूपित्याची व्यथा

लग्नात सोन्याचे दागिने करणे अपरिहार्य मानले जाते. मात्र, वाढलेल्या किंमतींमुळे हे सर्व आवाक्याबाहेर गेले आहे. लेकीला सोन्याने कसे मढवावे, हा प्रश्न सतत सतावत आहे, अशी भावना एका वधूपित्याने महासागर प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

# गटविकास अधिकाऱ्यांच्या संपामुळे महत्त्वाच्या कामांना ब्रेक

## मजुरांच्या उपजीविकेलाही धोका

महासागर | प्रतिनिधी




**परतवाडा,( दि.13 )** – वर्धा जिल्ह्यातील आष्टी पंचायत समितीत रोजगार हमी योजनेअंतर्गत सुमारे 60 लाख रुपयांच्या आर्थिक अनियमिततेच्या आरोपावरून गटविकास अधिकाऱ्याला अटक झाल्यानंतर संपूर्ण राज्यातील गटविकास अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईच्या निषेधार्थ राज्यातील अनेक जिल्ह्यांतील गटविकास अधिकाऱ्यांनी अचानक संप पुकारत कामकाज बंद केले. परिणामी ग्रामीण भागातील विकासकामे अक्षरशः ठप्प झाली आहेत.

या कामबंदीचा सर्वाधिक फटका रोजगार हमी योजनेतील मजूर आणि ग्रामपंचायतींना बसत आहे. मस्टर नोंदणी, हजेरी प्रक्रिया, मोजमाप पुस्तिका तपासणी, बिल मंजुरी आदी अत्यावश्यक प्रक्रिया थांबल्या आहेत. बांधकाम, सिंचन आणि रस्ते विकासकामांवर पूर्णतः विराम लागल्याने या कामांवर अवलंबून असलेल्या दैनिक मजुरांच्या उपजीविकेला तातडीचा धोका निर्माण झाला आहे. गावागावात 'काम कधी सुरू होणार?' असा सवाल उपस्थित होत असून अनेक ग्रामपंचायतींचे विकास आराखडे रखडले आहेत.

दरम्यान, या संपाबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गैरव्यवहार प्रकरणात चौकशी होणे स्वाभाविक आहे. त्यासाठी संपूर्ण यंत्रणा ठप्प करणे म्हणजे सामान्य जनतेला वेठीस धरणे, अशी प्रतिक्रिया उमटत आहे. सरकारी सेवक आचारसंहितेनुसार गैरव्यवहाराच्या संशयावर चौकशी व निलंबनाची तरतूद असताना संपाच्या माध्यमातून जबाबदारीपासून सुटका होऊ शकत नाही, अशी ठाम भूमिका नागरिकांनी मांडली आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

## बेपत्ता मुलांच्या शोधासाठी विशेष मोहीम राबवणार



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १३ : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी राज्यातील लहान मुले पळवण्याच्या टोळ्यांबाबत आणि लहान मुले बेपत्ता होण्याच्या वाढत्या प्रमाणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. या प्रकरणी विधिमंडळात चर्चा करण्याची गरज व्यक्त केली. राज ठाकरे यांच्या पत्राला गृहराज्यमंत्री कदम यांनी उत्तर दिले आहे.

योगेश कदम म्हणाले की, राज ठाकरे यांनी काय पत्र लिहिले मला माहिती नाही. पण लहान मुले अचानक हरवण्याच्या काही बातम्या आम्ही देखील पाहिल्या आहेत. मी या ठिकाणी एक आवर्जून सांगतो की जेव्हा लहान मुले हरवतात. तेव्हा त्यांचा तपास करण्यासाठी आपण विशेष तपास योजना राबवतो. या विशेष मोहिमांच्या दरम्यान हे लक्षात येते की अनेकांच्या मिसिंग तक्रारी दाखल नसतानाही त्यांना आपण शोधून काढले आहे.

योगेश कदम म्हणाले की, अल्पवयीन मुलं जेव्हा हरवतात किंवा बेपत्ता होतात त्यांचा तपास करण्यासाठी आपण विशेष मोहिम राबवतो. या मोहिमेत ९० टक्क्यापेक्षा जास्त मुलं-मुली आपल्याला सापडतात. परंतू याचा अर्थ असा नाही की १० टक्के मुलांना आम्ही शोधत नाही.

काही अल्पवयीन मुलं-मुली यांना शोधण्याची आपल्या टीम काम करतात असे असे राज्यमंत्री योगेश कदम यांनी म्हटले आहे. या विषयाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने लक्ष दिलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत बेपत्ता मुलांचा शोध घ्यावा असे निर्देश दिले आहेत.

**लहान मुले बेपत्ता होणे गंभीर विषय - गृहराज्यमंत्री**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी राज्यातील लहान मुले पळवण्याच्या टोळ्यांबाबत आणि लहान मुले बेपत्ता होण्याच्या वाढत्या प्रमाणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. तसेच या प्रकरणी विधिमंडळात चर्चा करण्याची गरज व्यक्त केली. राज ठाकरे यांच्या या पत्राला आता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिले आहे.

ते म्हणाले, राज ठाकरे यांनी काय पत्र लिहिले मला माहिती नाही. पण लहान मुले अचानक हरवण्याच्या काही बातम्या आम्ही देखील पाहिल्या आहेत. मी या ठिकाणी एक आवर्जून सांगतो की जेव्हा लहान मुले हरवतात. तेव्हा त्यांचा तपास करण्यासाठी आपण विशेष तपास योजना राबवतो. या विशेष मोहिमांच्या दरम्यान हे लक्षात येते की अनेकांच्या मिसिंग तक्रारी दाखल नसतानाही त्यांना आपण शोधून काढले आहे.

योगेश कदम पुढे म्हणाले, अशा घटना घडतात तेव्हा ९० टक्क्यांपेक्षा जास्त मुले सापडतात. त्यातील काही मुले हे स्वतःहून निघून गेलेली असतात किंवा आणखी काही वेगळ्या कारणांनी गेलेली असतात. यातील ९० टक्के मुले पुन्हा सापडतात. पण याचा अर्थ असा नाही की आम्ही उरलेल्या १० टक्के मुलांना शोधत नाही. त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाते. या विषयाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील गांभीर्याने लक्ष दिले असल्याचे योगेश कदम यावेळी म्हणाले.

### मुंडवा येथील जमीन गैरव्यवहार प्रकरणी

# अजित पवारांनी अधिकाऱ्यांवर फोडले खापर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीशी संबंधित पुण्यातील कोरेगाव पार्क (मुंढवा) परिसरातील ४० एकर जमिनीच्या व्यवहारामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात प्रमुख कुलमुखत्यारधार शीतल तेजवानी हिला पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली असून, तहसीलदार सूर्यकांत येवले आणि अमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र या संपूर्ण व्यवहाराशी संबंधित असलेल्या पार्थ पवार यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याने विरोधी पक्षांनी सरकारवर आणि पवार कुटुंबावर जोरदार टीका सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका मांडत मोठं वक्तव्य केलं आहे.

विधानसभेत मुद्रांक व नोंदणी शुल्क विभागाशी संबंधित एक महत्त्वाचं विधेयक मंजूर करण्यात आलं. या विधेयकानुसार, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाशी निगडित काही तक्रारींची सुनावणी आता थेट मंत्र्यांकडे केली जाणार असून, अशा प्रकरणांना थेट



न्यायालयात जाण्याची गरज भासणार नाही.

मात्र, या विधेयकाच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी थेट सवाल उपस्थित केला की, अमेडिया कंपनीशी संबंधित प्रकरणात पार्थ पवार यांना वाचवण्यासाठीच सरकारने हे विधेयक आणले आहे का? यावर देताना अजित पवार यांनी कोणाच्याही संरक्षणासाठी हे विधेयक आणलेले नसल्याचे स्पष्ट करत आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला.

अजित पवार यांनी अनौपचारिक चर्चेत या जमीन व्यवहाराबाबत भाष्य करताना जबाबदारी अधिकाऱ्यांवर टाकली. व्यवहार सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची सखोल तपासणी करणे अपेक्षित होते. जर त्या टप्प्यावरच काही त्रुटी आढळल्या असत्या आणि त्यावर तातडीने कारवाई झाली असती, तर पुढील गैरप्रकार घडले नसते, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. यामुळे या संपूर्ण प्रकरणात प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे चित्र आहे.

पुण्यातील मुंढवा परिसरातील सुमारे १८०० कोटी रुपयांच्या किमतीच्या जमिनीचा व्यवहार चर्चेत आला होता. आरोप असा करण्यात आला की, पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने ही जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी केली आणि स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रुपयांचा भरणा करण्यात आला.

उद्योग संचालनालयाकडून अवघ्या ४८ तासांत या व्यवहाराला मंजुरी देण्यात आली होती आणि संपूर्ण प्रक्रिया केवळ २७ दिवसांत पूर्ण झाल्याचे समोर आले होते. ही माहिती सार्वजनिक झाल्यानंतर राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्यानंतर अजित पवार यांनी स्वतः पुढे येत हा व्यवहार रद्द करण्यात आल्याची घोषणा केली होती.

## ही साधी चूक नाही तर सरळसरळ फ्रॉड...



अजित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणावर आपली भूमिका मांडली. मात्र त्यांच्या या वक्तव्यामुळे वाद शमण्याऐवजी आणखी पेटला असून, अंजली दमानिया यांनी आक्रमक भूमिका घेत अजित पवारांवर तीव्र शब्दांत टीका केली आहे.

पुण्यातील या जमीन व्यवहाराबाबत बोलताना अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे जबाबदारी अधिकाऱ्यांवर ढकलल्याचे दिसून आले. अजित पवार प्रशासनाची ढाल पुढे करत आपल्या पुत्रावरील आरोपांपासून स्वतःला आणि कुटुंबाला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा सुरु झाली आहे. मात्र, हे वक्तव्य अनेकांना न पटणारे ठरले असून, विशेषतः सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे.

अंजली दमानिया यांनी अजित पवारांच्या वक्तव्याची तीव्र शब्दांत खिल्ली उडवत संताप व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत उपमा देत म्हटले की, लहान मुलं शाळेत असताना, म्हणजेच कुकूले बाळ असताना, त्यांच्या भांडणात शिक्षकांनी लक्ष द्यायला हवं होतं, असं आपण म्हणू शकतो.

पण अजित पवारांच्या वक्तव्याची तुलना त्यांनी अशाच परिस्थितीशी केली आणि थेट सवाल केला की, पार्थ पवार काही कुकूले बाळ नाहीत.

त्यांनी पुढे ठामपणे सांगितले की, या प्रकरणात जी काही कृत्ये झाली आहेत, ती साधी चूक नाही तर सरळसरळ फ्रॉड आहे. एकदा नव्हे, तर सातत्याने कागदपत्रांमध्ये बदल करण्यात आले, सप्लीमेंट एलएलपी तयार करण्यात आली, रिझोल्यूशन पास करण्यात आले, खोटा एलओआय मिळवण्यात आला, त्यानंतर ॲडज्युडिकेशन करण्यात आले, विक्री व्यवहार करण्यात आला आणि अखेर ताबाही घेण्यात आला.

एखादी व्यक्ती इतक्या टप्प्यांतून हा व्यवहार पूर्ण करत असेल, तर ती चूक नसून सुनियोजित फसवणूक असल्याचे दमानिया यांनी ठामपणे नमूद केले.

## रायगडमधील नेत्यांना दादांचा स्पष्ट इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ : रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात सुरू असलेला तणाव आता महायुतीसाठी डोकेदुखी ठरू लागली आहे. राज्यभरात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा राजकीय सामना रंगलेला असताना, रायगडमध्ये मात्र सत्ताधारी पक्षांतर्गत संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे चित्र आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद अधिक चिघळला असून, आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः पुढाकार घेत हा संघर्ष थांबवण्याचा प्रयत्न केला.

रायगडमधील वाढत्या तणावामुळे महायुतीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना, अजित पवार यांनी थेट हस्तक्षेप करत शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीमुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून, रायगडमधील संघर्षावर तोडगा निघणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या बैठकीत अजित पवार यांनी दोन्ही पक्षांतील नेत्यांना संयम राखण्याचा सल्ला दिल्याचे समजते. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातील वाद अधिक तीव्र होऊ नयेत, यासाठी खबरदारी घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्टपणे मांडले.

कोणतेही वक्तव्य, कृती किंवा सोशल मीडियावरील आरोप यामुळे वातावरण अधिक बिघडू नये, अशी सूचना त्यांनी दिली. या बैठकीनंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्याशीही स्वतंत्रपणे संवाद साधला.

रायगडमधील राजकीय संघषार्मुळे महायुतीच्या प्रतिमेला धक्का बसू शकतो, याची जाणीव ठेवून सर्वांनी जबाबदारीने वागावे, असे संकेत या चर्चेत देण्यात आल्याची माहिती अनौपचारिक गप्पांमधून समोर आली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर शिवसेना आमदार भरत गोगावले यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवारांनी जर वाद न वाढवण्याची भूमिका घेतली असेल, तर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेत्यांनाही तशाच स्पष्ट सूचना द्याव्यात, एखाद्या नेत्याची जाणीवपूर्वक बदनामी करणे योग्य नसल्याचे गोगावले म्हणाले.

## 'शिंदेसेना' म्हटल्यावरून शिवसेना - ठाकरे गट समोरासमोर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ : विधानसभेत आज सत्ताधारी शिवसेना व विरोधी बाकावरील ठाकरे गटात पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली. ठाकरे गटाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा उल्लेख असा केला. त्यावर शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र आक्षेप केला.



आम्हाला आयोगाने शिवसेना हे नाव दिले आहे. त्यामुळे आमचा उल्लेख शिवसेना असाच व्हावा, असे ते म्हणाले. यावेळी राष्ट्रवादीच्या अनिल पाटलांनीही आम्हाला राष्ट्रवादी काँग्रेस म्हणूनच ओळखले जावे, अशी मागणी केली. सत्ताधारी पक्षांना स्वतःच्या ओळखीसाठी असा संघर्ष करावा लागत असल्याने या प्रकाराची विधानभवन परिसरात खमंग चर्चा रंगली होती.

ठाकरे गटाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी विधानसभेत वांद्यातील शासकीय वसाहतीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्यात ते म्हणाले, येथील कर्मचारी मागील अनेक वर्षांपासून हक्कांच्या घरांसाठी संघर्ष करत आहेत. विधानसभेच्या निवडणुकीवेळी १४ऑक्टोबर २०२४ रोजी सरकारने एक परिपत्रक काढून संबंधितांना प्लॉट देण्याची ग्वाही दिली. त्यानंतर निवडणूक झाली. नवे सरकार आले. पण त्यावर काहीच झाले नाही. त्यामुळे सरकारने हा प्लॉट किती मोठा व कधी देणार आहात? हे स्पष्ट करावे.

सरकारने जीआर काढल्यानंतर आजपर्यंत वांद्यात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना १४ प्लॉटचे वाटप केले आहे. या प्रकरणी तुम्ही कोणतीही समिती बनवली नाही. मग यावेळी तुम्ही समिती का बनवली. समिती बनवायची होती तर ती बनवायला ७ महिने का लागले. समिती बनल्यानंतर तिची बैठक घेण्यास ७ महिने का लागले? असे प्रश्न यावेळी त्यांनी उपस्थित केले.

या समितीत तुम्ही भाजपचे २ पदाधिकारी घेतलेत, शिंदेसेनेचा १ पदाधिकारी घेतला. अजितदादांच्या पक्षाचा एक माजी पदाधिकारी घेतला. मी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी आहे, मग मला त्या समितीत का घेण्यात आले नाही? असे ते म्हणाले.

वरुण सरदेसाई यांच्या प्रश्नाला शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी उत्तर दिले. त्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी या चर्चेत हस्तक्षेप केला. वरुण सरदेसाई यांनी एकदा नाही दोनदा आमच्या पक्षाचा उल्लेख शिंदेसेना म्हणून केला. त्यांनी केंद्रीय निर्णय निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय तपासून पहावा. आयोगाने घटनेने कायदे तपासून शिवसेना धनुष्यबाण हे नाव आम्हाला दिले आहे. आमचे नाव शिवसेना असे आहे, असे ते म्हणाले.

# भरधाव कार मागून कंटेनरवर आदळली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ : मुंबई-गोवा महामार्गावर आज सकाळी भीषण अपघाताची घटना घडली असून या दुर्घटनेत दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे.

मुंबईकडून कोकणाच्या दिशेने भरधाव वेगात जाणारी कार मागून एका कंटेनरवर आदळल्याने हा भीषण अपघात झाला. अपघात इतका तीव्र होता की कारचा अक्षरशः चुराडा झाला आहे.



### मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात
### दोघांचा मृत्यू

ही दुर्घटना सकाळच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाडजवळील पुई गावाच्या हद्दीत घडली. अपघातग्रस्त वाहन हुंडई कंपनीची ऑरा कार असल्याची माहिती मिळाली आहे. कार कंटेनरच्या मागील भागावर जोरात आदळल्याने वाहनाचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला. या अपघातात कारमधील दोघांनी जागेवरच प्राण सोडले, तर काही प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस, महामार्ग पोलिस आणि मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. कारमध्ये अडकलेल्या एका जखमी व्यक्तीला हायड्रॉलिक कटरच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. जखमींना तातडीने कोलाड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या बचावकार्यामध्ये सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे रेस्क्यू पायलटही सहभागी झाले होते. त्यांनी घटनास्थळी पोहोचून अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली. अपघाताचे स्वरूप पाहता वेगावर नियंत्रण नसणे किंवा कंटेनर अचानक थांबल्याने ही धडक बसली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

## शहांच्या दट्टयानंतर भाजप मागे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ : केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या पक्षाला भाजप सुद्धा टाळू शकत नाही. त्यांच्या एका दट्ट्यामुळे महाराष्ट्र भाजपने एक पाऊल मागे टाकत महापालिका निवडणुकांसाठी शहांच्या पक्षाबरोबर युती केली, अशा शब्दांत ज्येष्ठ विधिज्ञ असीम सरोदे यांनी सत्ताधारी शिवसेना - भाजप युतीवर निशाणा साधला आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नुकतीच सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीत भाजप - शिवसेनेने आगामी महापालिका निवडणुका मिळून लढवण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी,रवींद्र चव्हाण यांनी शिवसेनेचे अनेक पदाधिकारी फोडून शिंदेंच्या नाकीनऊ आणले होते. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शिंदे चांगलेच नाराज झाले होते. त्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आणि महाराष्ट्र भाजपच्या भूमिकेत अचानक बदल झाला.

रवींद्र चव्हाण यांनी दोन दिवसांपूर्वी नागपुरात एकनाथ शिंदेंची भेट घेतली. या भेटीनंतर दोन्ही नेत्यांनी महापालिका निवडणुका मिळून लढवण्याची घोषणा केली. यामुळे भाजप व शिवसेनेतील राजकीय कटूता दूर झाल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर वकील असीम सरोदे यांनी सेना - भाजपच्या युतीवर नाव न घेता वरील शब्दांत निशाणा साधला आहे.

अमित शहांच्या महाराष्ट्रातील पक्षाला भाजप सुद्धा टाळू शकत नाही. शेवटी अमित शहांच्या दट्यानंतर राज्यातील भाजपचे एक पाऊल मागे आणि महापालिका निवडणुकांसाठी अमित शहांच्या पक्षाबरोबर भाजपची युतीची घोषणा, असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

## 'व्हीव्हीपॅट' स्लिपची बूथनिहाय संपूर्ण मोजणी करा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ : देशातील सर्व निवडणुका मत पत्रिकेवर घेण्यात याव्यात. कुठल्या कारणाने ते शक्य झाले नाही तर, 'व्हीव्हीपॅट' मध्ये पडणाऱ्या सर्व स्लिपची बूथनिहाय मोजणी करून ती ईव्हीएम मधील मतदानाशी जुळवावी, अशी आग्रही मागणी बसपाने केली आहे. निवडणुकीदरम्यान तसेच निकालानंतर अनेकदा तक्रारी व संशय व्यक्त केला जातो. निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा पूर्ण विश्वास बसावा, यासाठी हे बदल आवश्यक असल्याचे मत मायावती यांनी व्यक्त केले, अशी माहिती राज्याचे महासचिव डॉ. हुलगेश चलवादी यांनी दिली.

### विदर्भ, मुंबई आणि पालघरच्या मुद्द्यावर

# खा. संजय राऊत आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा स्वतंत्र विदर्भाच्या मागणीने जोर धरला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेगळ्या विदर्भासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काम करत असल्याचे स्पष्ट केल्यानंतर हा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.



काँग्रेसमधील विदर्भातील काही नेत्यांनीही या भूमिकेला दुजोरा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करतानाच मित्र पक्ष काँग्रेसलाही सणसणीत टोले लगावले आहेत.

संजय राऊत यांनी आपल्या टीकेची पहिली तोफ थेट भाजपकडे वळवली. त्यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत सांगितले की, राज्याच्या कॅबिनेटमधील एक महत्त्वाचा मंत्री खुलेआम महाराष्ट्राचे तुकडे करण्याची भाषा करत आहे आणि मुख्यमंत्री त्यावर काम करत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र या सगळ्या घडामोडींवर एकनाथ शिंदे गटाचा एकही आमदार बोलत नाही, यावरूनच सर्व चित्र स्पष्ट होत असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

महाराष्ट्र तोडण्याच्या अजेंड्यावर अमित शाह यांचा छुपा डाव असल्याचा आरोप करत, मुंबई आणि विदर्भ वेगळे करण्याच्या कटाला सत्ताधाऱ्यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याचा दावा राऊत यांनी केला.

यावेळी संजय राऊत यांनी पालघर जिल्ह्याचा मुद्दा उपस्थित करत गुजरातकडून होणाऱ्या कथित घुसखोरीवरही गंभीर आरोप केले. पालघरमधील बहुतांश ठेकेदार गुजराती असल्याचा दावा करत, हा प्रभाव भविष्यात आणखी वाढणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात गुजरातने डांग, उंबरगाव, डहाणू आणि पालघरवर दावा सांगितल्याची आठवण करून देत, हा भाग अजूनही त्यांच्या अजेंड्यावर असल्याचे राऊत म्हणाले. बुलेट ट्रेनचा मार्ग पालघरमधून नेण्यामागेही हाच हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्राने डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे सांगत, महाराष्ट्र म्हणजे फडणवीस सरकार नाही, असा टोला त्यांनी लगावला.

स्वतंत्र विदर्भाच्या मुद्द्यावर वडेट्टीवार यांनी बावनकुळे यांच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याचे समोर आल्यानंतर राऊतांनी यावर स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. वडेट्टीवार किंवा काँग्रेसच्या भूमिकेला फारसं महत्त्व देत नाही, यापूर्वीही काँग्रेसमध्ये मतभेद झाल्याचे त्यांनी आठवण करून दिली.

मात्र महाराष्ट्र अखंड राहावा यासाठी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाची सहमती असल्याचा दावा करत, काँग्रेसने कितीही राजकारण केले तरी वेगळा विदर्भ होणार नसल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजप कितीही प्रयत्न करो, मराठी माणूस महाराष्ट्राचे तुकडे होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

राजकीय समीकरणांवर भाष्य करताना संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि अमित शहा यांच्यावरही थेट आरोप केले. एकनाथ शिंदे यांची स्वतंत्र राजकीय ताकद नसल्याचा दावा करत, त्यांना केवळ भाजपच्या मतांवर आपली राजकीय वाटचाल करावी लागत असल्याचे ते म्हणाले.

## पुणे पुस्तक महोत्सवात जयशंकर यांच्यासह अनेक मान्यवरांचा सहभाग

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ : अवघ्या तीनच वर्षात भारतातील सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा पुस्तक महोत्सव म्हणून ख्याती मिळवलेला नॅशनल बुक ट्रस्टचा पुणे पुस्तक महोत्सव आजपासून सुरू झाला आहे. २१ डिसेंबरपर्यंत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित ग्रंथमहोत्सवात विविध भरगच्च कार्यक्रम होणार आहेत.

त्यामध्ये परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, बुकर पुरस्कारप्राप्त लेखिका बानू मुश्ताक, प्रख्यात अभिनेता सचिन पिळगावकर, मेट्रो वुमन अश्विनी भिडे, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, पर्सिस्टंट कंपनीचे डॉ. आनंद देशपांडे, माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित, जडण-घडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील दिग्गज सहभागी होणार आहेत.

सर्व भारतीय भाषांचे मिळून ८०० ग्रंथविक्री स्टॉल्स आणि १०० फुड स्टॉल्स यंदा उभारण्यात आले असून १२ लाख पुस्तके वाचकांना विक्रीसाठी उपलब्ध



असतील असा अंदाज आहे.

पुस्तक महोत्सवाच्या दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक क्षेत्रातील मान्यवर भेट देणार आहेत. ir्व दिवसांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील साहित्यविषयक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ऐतिहासिक ॲम्फी थिएटरमध्ये होणाऱ्या पुणे लिट फेस्ट' मध्ये शरणकुमार लिंबाळे, जयंत उमराणीकर (कअ.र.) प्रशांत पोळ, ऋषिकेश गुप्ते, अभिजित जोग, माजी कुलगुरु डॉ. वसंत शिंदे, सारंग दर्शने, अभिराम भडकमकर, प्रख्यात बी. व्ही. जी. कंपनीचे प्रमुख हणमंतराव गायकवाड, अभिनेता विराजस कुलकर्णी, स्वानंदी सरदेसाई आणि ऊर्मिला निंबाळकर, सिद्धार्थ काक, श्रिया पिळगावकर, गिरीजा ओक, ज्येष्ठ पत्रकार एम. जे. अकबर आणि अमि गणात्रा, पायलट ग्रूप कॅप्टन शुभांशू शुक्ला, पंकज भार्गव सहभागी होत आहेत.

१६ ते १८ च्या दरम्यान होणाऱ्या मराठी लिट फेस्टचे उद्घाटन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्या हस्ते होणार आहे. त्यामध्ये लेखनातून स्वबोध, राखीगढी संशोधन, राष्ट्रीय सुरक्षेसमोरचे धोके, प्रशासनात वावरताना, उद्योजकतेचे समरांगण, संशोधनपर चरित्रलेखन, भैरप्पा-एक पर्व, लेखनाच्या नव्या दिशा, साहित्य आणि समाज, मराठी साहित्यातील बदलती पुरुष प्रतिमा अशा विविध विषयांवर दिग्गजांच्या मुलाखती होणार आहेत.

याच महोत्सवात १७ डिसेंबरला दुपारी १ वाजता होणाऱ्या सत्रात इतिहासाचार्य राजवाडे ते गजाननराव मेहेंदळे- ऐतिहासिक लेखन संशोधन' या विषयावर प्रख्यात अभ्यासक, लेखक, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ. सागर देशपांडे हे घेणार आहेत. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त या विशेष मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

चिल्ड्रेन्स कॉर्नर' हा स्वतंत्र विभागही या महोत्सवात असून कथाकारांचेही प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. याशिवाय पुण्यश्लोक, तुका म्हणे, ऋतू बावरा, शाहीर योगेश यांचा राष्ट्र आराधना, तालोत्सव, कीर्तवाणी, फोक लोक, निरंतर, पराशरा बॅण्ड, थाईक्कुडम ब्रीज हे विविध प्रांतातील सांस्कृतिक कार्यक्रमही या पुस्तक महोत्सवात होणार असल्याचे पांडे यांनी सांगितले.

सुमारे २० लाखांपेक्षा अधिक वाचक या पुस्तक महोत्सवाला भेट देतील असा अंदाज असून नुकत्याच पार पडलेल्या शांतता, पुणेकर वाचत आहेत' या उपक्रमात साडेसात लाख वाचकांनी थेट सहभाग घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रंथोत्सवात पुणेकरांचीही मोठी हजेरी असणार आहे.

## एक कोटी शेळ्या सोडण्याचा निर्णय हास्यास्पद!

### अजित पवारांनी फेटाळला वनमंत्र्यांचा प्रस्ताव



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि.१३ :** राज्यात बिबट्यांचा हैदोस दिवसेंदिवस तीव्र होत चालला असून मानवी वस्त्यांमध्ये बिबट्यांचा मुक्त संचार ही गंभीर समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलामध्ये एक कोटी शेळ्या सोडण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे.

या निर्णयावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनौपचारिक चर्चेत बोलताना तीव्र नाराजी व्यक्त करत, हा निर्णय अत्यंत हास्यास्पद असल्याची स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यावर उपाय शोधताना गंभीरतेचा अभाव असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली.

अजित पवार यांनी बिबट्यांच्या संख्येबाबत चिंता व्यक्त करताना सांगितले की, राज्यात बिबट्यांची संख्या दोन हजारांपेक्षा अधिक असण्याची दाट शक्यता आहे. मात्र, त्यांना पकडून वनतारामध्ये हलवण्याच्या चर्चांवर बोलताना त्यांनी वास्तव मांडले. वनताराकडून राज्य सरकारला स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, ते ५० पेक्षा अधिक बिबट्यांना सामावून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे सर्व बिबटे पकडून वनतारामध्ये सोडणार, अशा चर्चा प्रत्यक्षात अमलात आणणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याच संदर्भात जंगलामध्ये एक कोटी शेळ्या सोडण्याच्या कल्पनेवर अजित पवारांनी थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बिबट्यांची नसबंदी हा पर्याय चर्चेत असला तरी, त्याचे परिणाम दिसायला अनेक वर्षांचा कालावधी लागेल, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे तातडीच्या समस्येवर दीर्घकालीन आणि अव्यवहार्य उपाय सुचवले जात असल्याचा सूर त्यांच्या वक्तव्यातून स्पष्टपणे उमटला.

जंगलाबाहेर बिबटे येऊ नयेत, यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात एक कोटी शेळ्या सोडण्याचा निर्णय घेतल्याचे जाहीर केले होते. या निर्णयामागे जंगलातील भक्ष्याची कमतरता हे कारण पुढे करण्यात आले होते. मात्र, या उपायावर आता प्रशासन, राजकारण आणि समाजातील विविध घटकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**बकऱ्यांच्या गळ्यात टॅग**

प्रत्येक जिल्ह्यात बिबट्यांसाठी शेळ्या किंवा बकऱ्या गळ्यात टॅग लावून जंगलात सोडण्याचा विचार असल्याचे नाईक यांनी सांगितले होते. येणार नाही, असे आवाहनही त्यांनी केले होते. नाईक यांनी बिबट्यांना आफ्रिकेला पाठवण्याबाबतही वक्तव्य केल्याने वाद अधिकच वाढला. ज्या भागांत बिबट्यांची संख्या जास्त आहे, तेथील बिबटे आफ्रिकेला हलवण्याचा विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यावरून अजित पवारांनी टीका केली.

## मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने व्हॉईस ऑफ मीडियाच्या उपोषणाची सांगता

### मंत्री प्रसाद लोढा यांनी उपोषणस्थळी येऊन सोडवले आंदोलन

### मागण्यांचा जीआर निघेपर्यंत लढा सुरूच राहणार : संदीप काळे





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :** हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पत्रकार व पत्रकारितेशी संबंधित ३३ मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमच्या वतीने यशवंत स्टेडियम येथे सुरू असलेले उपोषण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थी व आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. मंत्री प्रसाद लोढा यांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देत उपोषणाची सांगता केली.

अधिवेशन सुरू झाल्यापासून व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या वतीने हे उपोषण सुरू होते. १५ व १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शिखर अधिवेशनात वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओ आणि डिजिटल मीडियासंदर्भातील ३३ मागण्यांचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले होते. या ठरावांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी पदाधिकारी साखळी उपोषणावर बसले होते.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मागील चार दिवसांत उपोषणस्थळी अनेक मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये १० आमदार, ३ खासदार आणि ४ माजी मंत्र्यांचा समावेश होता. संघटनेने पत्रकार व पत्रकारितेसाठी केलेले कार्य सरकारपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन प्रत्येक भेट देणाऱ्या मान्यवरांनी दिले.

दरम्यान, माजी मंत्री तथा कॅबिनेट मंत्री मंगलप्रसाद लोढा हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूत म्हणून उपोषणस्थळी आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला हे उपोषण सोडवण्यासाठी पाठवले आहे. आपल्या मागण्या मान्य केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने दिले. व्हॉईस ऑफ मीडियाने चौथा स्तंभ मजबूत करण्यासाठी केलेले कार्य नोंद घेण्यासारखे असून, संघटनेने असेच काम पुढे सुरू ठेवावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

यानंतर मंत्री लोढा यांच्या हस्ते व्हॉईस ऑफ मीडियाचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, विश्वस्त व महाराष्ट्र समन्वयक किशोर कारंजेकर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अनिल मस्के, नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे आणि राज्य कोअर कमिटीचे प्रमुख कल्पेश महाले यांना ज्यूस देऊन उपोषणाची अधिकृत सांगता करण्यात आली. याप्रसंगी राज्यभरातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना संदीप काळे म्हणाले की, संपूर्ण प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून, मुख्यमंत्र्यांनी सर्व मागण्या मान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन सविस्तर भूमिका मांडली जाईल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, जोपर्यंत मागण्यांचा शासन निर्णय निघत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

उपोषणाच्या सांगतेवेळी व्हॉईस ऑफ मीडिया जिंदाबादच्या घोषणांनी यशवंत स्टेडियम परिसर दणाणून गेला. आंदोलनात सहभागी सर्व पदाधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह दिसत होता. पत्रकारांनी पत्रकारितेसाठी उभा केलेला हा लढा महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अधिकारीच सत्ताधाऱ्यांना बुथमागे १५० मते देतात

### प्रकाश आंबेडकरांचा आरोप



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** निवडणुकीत प्रत्येक बुथवरील अधिकारीच सत्ताधारी पक्षाला १०० ते १५० मते टाकत असल्याचा आरोप करून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी खळबळ उडवून दिली. मतांची चोरी होत नसून, सत्ताधारी पक्षाला अधिकची मते देण्याची परिस्थिती अधिकारी वर्गच निर्माण करत आहे, असे ते म्हणालेत.

देशात व महाराष्ट्रात विरोधी पक्षांनी विशेषतः काँग्रेसने कथित मतचोरीच्या मुद्यावरून सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. मतदारयाद्यांमध्ये घोळ करून भाजप निवडणुका जिंकत असल्याचा आरोप या प्रकरणी केला जात आहे. चुकीच्या प्रश्नावर आपण लढलो तर लोकं साथ देत नाही, हे बिहारच्या निवडणुकीवरून दिसून आले आहे. मताच्या चोरीपेक्षा निवडणुकीच्या बुथमध्ये जे अधिकारी बसले आहेत, ते बसलेले अधिकारी प्रत्येक बुथमध्ये शे दिडशे मते सत्ताधारी पक्षाला टाकतात. आपण हे लक्षात घेतले पाहिजे.

सध्या मतांची चोरी होत नाही, तर सत्ताधारी पक्षाला अधिकची मते देण्याची परिस्थिती अधिकारी वर्ग निर्माण करत आहे. ते हे काम सहजपणे करतात, असे ते म्हणालेत. आंबेडकर पुढे म्हणाले, वंचितच्या मुंबईतील संविधान रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्याची धडकी सत्ताधाऱ्यांना बसली आहे.



■ **नागपूर :** शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस झाल्यानंतर अनेक शिक्षकांवर कारवाई केली जाण्याचे संकेत असून, यामुळे विदर्भातील शिक्षक वर्गात कमालीची धास्ती भरली आहे. सदर प्रकरणात शिक्षकांवर कारवाई केली जावू नये, असे शिक्षकांची मागणी असून, त्यासाठी शनिवारी शिक्षक, शिक्षिकांनी विधीमंडळावर भव्य मोर्चा काढला. यावेळी एका शिक्षिकेची प्रकृती बिघडल्याने शासकीय रूग्णवाहिकेतून तातडीने रूग्णालयात हलविण्यात आले.

## महाराष्ट्र लुटण्यात धन्यता मानू नका

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :** महाराष्ट्रातील २.५६ लाख महिला आणि मुली गायब आहेत.



यामागे एक मोठे रॅकेट आहे. ते शोधण्यासाठी सरकारने स्वतंत्र यंत्रणेचा वापर करावा. सरकार एक-दोन महिलांना शोधून ८० टक्के सापडल्याचे सांगते असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले आहे. गृह खात्याचे दुर्लक्ष आणि राज्य सरकारची असंवेदनशीलता यामुळे नागरिकांची सुरक्षा धोक्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

वडेट्टीवार म्हणाले की, गायब महिलांसाठी स्वतंत्र यंत्रणा राबवावी, रस्त्यावर भीक मागणाऱ्यांच्या डीएनए तपासण्या कराव्यात, असे आवाहन केले असून, फक्त संपत्ती लुटण्यात महाराष्ट्राला धन्यता मानू नये. आम्ही संजय राऊत यांना फार महत्त्व कुठे देतो, आणि देण्याची गरज काय? मविआत असलो तरी त्यांचे आणि माझे विचार वेगळे आहेत.

## नानाभाऊ एंबडवार यांचे निधन



■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. १३:** विदर्भवीर भाऊ जांबवंतराव धोटे यांचे सहकारी, माजी मंत्री नानाभाऊ एंबडवार यांचे आज १३ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार १४ डिसेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

भाऊ जांबवंतराव धोटे यांच्या फॉरवर्ड ब्लॉकच्या सक्रिय राजकारणातील प्रारंभीपासून अनेक वर्ष ते कट्टर सहकारी राहिले. प्रारंभी धोटे यांच्यासोबत फॉरवर्ड ब्लॉकच्या राजकारणात सक्रिय राहून ते काँग्रेस पक्षात गेले. काँग्रेसमध्ये असताना त्यांनी काही काळ मंत्रिपदही भुषविले. पुढे भाऊ धोटे यांनी काँग्रेस सोडल्यानंतर, नानाभाऊ यांनी सुद्धा काँग्रेस सोडली. कालांतराने नानाभाऊ हळूहळू राजकारणापासून दुरावत गेले, अलीकडे ते राजकारणातून पूर्णतःअलिप्त झाले होते.

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडयाजवळ कोंघारा येथे त्यांची शेती आहे,त्या ठिकाणी ते राहत होते.आज सकाळी त्यांचे कोंघारा येथेच दुःखद निधन झाले. उद्या त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. स्वर्गीय नानाभाऊ एंबडवार यांच्या पश्चात पुत्र दीपक, आनंद, रवि, स्नूषा,नातु पणतू असा मोठा आप्तपरिवार आणि राजकीय मोठा गोतावळा आहे.


Government of Maharashtra | Ministry of Railways

-महा रेल- MRIDC

## लोकार्पण सोहळा

दिनांक : सोमवार, १५ डिसेंबर २०२५, सकाळी ११.०० वाजता

**स्थळ :** सुभाष पुतळा, सतरंजीपुरा, लकडगंज पोलीस स्टेशनजवळ, नागपूर – ४४० ००८



**श्री. नरेंद्र मोदी**
मा. पंतप्रधान, भारत सरकार



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. नितीन गडकरी**
मा. केंद्रीय मंत्री, परिवहन, महामार्ग विभाग, भारत सरकार



**श्री. एकनाथ शिंदे**
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

### महाराष्ट्र राज्यातील ७ आरओबी, १ आरयूबी, ३ भुयारी मार्ग आणि नागपूर शहरातील लकडगंज उड्डाणपुल

- काटोल येथील रेल्वे फाटक क्र. २८२ वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- कळमना येथील रेल्वे फाटक क्र. ५६७ वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- साखरवही येथील रेल्वे फाटक क्र. ३९ए वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- बाबुपेठ येथील रेल्वे फाटक क्र. ४३ए येथील भुयारी मार्ग
- बडनेरा येथील रेल्वे फाटक क्र. एस ३ येथील दोन मार्गिका असलेला भुयारी मार्ग
- धामणगाव येथील रेल्वे फाटक क्र. ७४ येथील भुयारी मार्ग
- परभणी येथील रेल्वे फाटक क्र. १२२ वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- पूर्णा येथील रेल्वे फाटक क्र. १३४ ए व १७६ ए वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- तिरोडा येथील रेल्वे फाटक क्र. ५२० वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- हिंगोली येथील रेल्वे फाटक क्र. १४४ बी येथील भुयारी मार्ग
- वसगडे येथील रेल्वे फाटक क्र. ११९ वरील २ मार्गिका उड्डाणपूल
- नागपूर येथील लकडगंज उड्डाणपूल

**प्रमुख उपस्थिती**

श्री. चंद्रशेखर बावनकुळे – मा. मंत्री, महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री
श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले – मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य
श्री. प्रताप सरनाईक – मा. मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य
श्री. चंद्रकांत (दादा) पाटील – मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सांगली जिल्हा
श्री. अशोक उइके – मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री गोंदिया जिल्हा
श्री. बाबासाहेब पाटील – मा. मंत्री, तथा पालकमंत्री गोंदिया जिल्हा
श्री. नरहरी झिरवाळ – मा. मंत्री, अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य तथा पालकमंत्री हिंगोली जिल्हा
ॲड. आशिष जयस्वाल – मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्रीमती माधुरी मिसाळ – मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर – मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री. इंद्रनील नाईक – मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**सन्माननीय उपस्थिती**

श्री. प्रफुल्ल पटेल – राज्यसभा सदस्य
डॉ. अनिल बोंडे – राज्यसभा सदस्य
श्रीमती फौझिया खान – राज्यसभा सदस्य
श्री विशाल पाटील – लोकसभा सदस्य, सांगली
श्री. बळवंत वानखेडे – लोकसभा सदस्य, अमरावती
श्री. संजय जाधव – लोकसभा सदस्य, परभणी
श्री. अमर काळे – लोकसभा सदस्य, वर्धा
श्री. धैर्यशील माने – लोकसभा सदस्य, हातकणंगले
श्री. श्यामकुमार बर्वे – लोकसभा सदस्य, रामटेक
डॉ. प्रशांत पडोळे – लोकसभा सदस्य, भंडारा गोंदिया
श्री. नागेश आष्टीकर – लोकसभा सदस्य, हिंगोली
श्रीमती प्रतिभा धानोरकर – लोकसभा सदस्य, चंद्रपूर
श्री. अभिजीत वंजारी – आमदार, विधान परिषद
श्री. सुधाकर अडबाले – आमदार, विधान परिषद
डॉ. परिणय फुके – आमदार, विधान परिषद
श्री. कृपाल तुमाणे – आमदार, विधान परिषद
श्री. संदीप जोशी – आमदार, विधान परिषद
श्री. विक्रम काळे – आमदार, विधान परिषद
श्री. किरण सरनाईक – आमदार, विधान परिषद
श्री. धिरज लिंगाडे – आमदार, विधान परिषद
श्री. सतीश चव्हाण – आमदार, विधान परिषद
श्री. संजय खोडके – आमदार, विधान परिषद
श्री. रामराजे नाईक निंबाळकर – आमदार, विधान परिषद
श्री. अरुण लाड – आमदार, विधान परिषद
डॉ. प्रज्ञा सातव – आमदार, विधान परिषद
प्रा. जयंत असगावकर – आमदार, विधान परिषद
श्री. सदाशिव खोत – आमदार, विधान परिषद
श्री. इद्रिस नायकवडी – आमदार, विधान परिषद
श्री. कृष्णा खोपडे – आमदार, विधान सभा नागपुर पूर्व
डॉ. नितिन राऊत – आमदार, विधान सभा नागपुर उत्तर
श्री. चरणसिंह ठाकूर – आमदार, विधान सभा काटोल
श्री. रवी राणा – आमदार, विधान सभा बडनेरा
श्रीमती सुलभा खोडके – आमदार, विधान सभा अमरावती
श्री. विजय रहांगडाले – आमदार, विधान सभा तिरोडा
डॉ. राहुल पाटील – आमदार, विधान सभा परभणी
श्री. रत्नाकर गुट्टे – आमदार, विधान सभा गंगाखेड
श्री. राजेश विटेकर – आमदार, विधान सभा पाथरी
श्री. किशोर जोरगेवार – आमदार, विधान सभा चंद्रपूर
डॉ. तान्हाजी मुटकुळे – आमदार, विधान सभा हिंगोली
डॉ. विश्वजीत कदम – आमदार, विधान सभा पलुस कडेगाव
श्री. प्रताप अडसड – आमदार, विधान सभा, धामणगाव रेल्वे

आणि संबंधित क्षेत्राचे इतर सर्व मा. राज्यसभा व लोकसभा सदस्य, मा. विधान परिषद व विधानसभा सदस्य

2nd Floor, Hoechst House, NCPA Road, Nariman Point, Mumbai- 400 021
info@maharail.com | +91 22 68517410/ 67477510 | www.maharail.com
https://www.facebook.com/maharailmridc/ | https://www.twitter.com/Maharail_Corp
https://www.linkedin.com/mridc-mumbai-97ab27194/

विनित
**राजेश कुमार जायसवाल**
व्यवस्थापकीय संचालक, महारेल